**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामदास बाबू खोत
सेक्टर नं.२८, प्लॉट नं.१११, निगडी प्राधिकरण, पुणे-४४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
कवठे महांकाळ, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामपंचायत कार्यालय, रामपूरवाडी,
पो.करोली, कवठे महांकाळ, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४०८ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रामदास बाबू खोत
सेक्टर नं.२८, प्लॉट नं.१११, निगडी प्राधिकरण, पुणे-४४

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
कवठे महांकाळ, ता.कवठे महांकाळ, जि.सांगली श्री.दिलीप परशुराम शिंदे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामपंचायत कार्यालय, रामपूरवाडी, पो.करोली, कवठे महांकाळ,
ता.कवठे महांकाळ, जि.सांगली श्री.मनोहर आनंदा सातपुते

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

सन १९५४ पासून वारस नोंदीबाबत योग्य कार्यवाही केलेली नाही व त्याबाबतची माहितीही दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रामदास बाबू खोत यानी केली.

संबंधित प्रकरणी जिल्हा न्यायालयात दावा चालू असून सन १९९९ ते २००० या काळात अपीलकर्त्यांच्या चुलत्याचे नांव कागदोपत्री लावण्यात आले असून पूर्वीपासूनच्या सर्व कागदपत्रांच्या प्रती व माहिती वेळोवेळी दिली आहे. तसेच सर्व कागदपत्रे समक्ष दाखविली आहेत. अपीलकर्त्यास आवश्य असल्यास महसूल नियमावलीअंतर्गत अपील करावे लागेल, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कवठेमहांकाळ, ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली श्री.दिलीप परशुराम शिंदे यानी केले. ते लक्षात घेता अपीलकर्त्याची तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मधु दुनिचंद सबनानी
११२/१/१, राधाकृष्ण कॉलनी, हीना पॅलेससमोर, नढेनगर, काळेवाडी, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (जकात), पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य आयातकर अधीक्षक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९६७ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मधु दुनिचंद सबनानी
११२/१/१, राधाकृष्ण कॉलनी, हीना पॅलेससमोर, नढेनगर, काळेवाडी, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (जकात), पिंपरी चिंचवड
महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ श्री.अशोक हरिभाऊ मुंढे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य आयातकर अधीक्षक, पिंपरी चिंचवड
महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ श्री.आर.एच.भिसे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जकातीच्या रिटर्नसंदर्भात आपण मागितलेली माहिती वेळेत दिलेली नसल्यामुळे शुल्क घेता येणार नाही. माहिती निःशुल्क दिली पाहिजे, अशी मागणी अपीलकर्ता श्री.मधु दुनिचंद सबनानी यानी केली.

जकात नियमावलीतील माहिती श्री.सबनानी यानी मागितली होती. अभिप्रायवजा विचारणेच्या स्वरूपात ती असल्यामुळे देता येत नसल्याचे विहित मुदतीत कळविले. नियमाची प्रत हवी असल्यास शुल्क भरून घ्यावी, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (जकात), पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यानी दिल्यानुसार शुल्क कळविले, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा मुख्य आयातकर अधीक्षक, महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.आर.एच.भिसे यानी केले. सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेली ही माहिती असून जन माहिती अधिकाऱ्यांनी उत्तर विहित मुदतीत दिले होते. त्यामुळे नियमाची प्रत हवी असल्यास अपीलकर्त्यांनी शुल्क भरले पाहिजे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (जकात), पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.अशोक हरिभाऊ मुंढे यानी केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विकी विक्रम कुमार
द्वारा-श्री.संजय बाबुराव हाटकर
८/१४, इंदिरा शंकर नगरी, व्ही.एस.७, कोथरूड, पुणे-२९ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सेंट मेरी स्कूल, ५-बी, जनरल भगत मार्ग, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सेंट मेरी स्कूल, ५-बी, जनरल भगत मार्ग, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४४४ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा सेंट मेरी स्कूल, ५-बी, जनरल भगत मार्ग, पुणे
प्रतिनिधी ॲड.किरण गोविंद गंजकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

सेंट मेरी स्कूलला शासनाकडून कोणतेही अनुदान वा अर्थसहाय्य मिळत नाही, तयामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २(एच)मधील तरतुदीनुसार ही संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण'ठरत नाही. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसून अर्जाचा विचार करता येणार नाही, असे अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सेंट मेरी स्कूल, ५-बी, जनरल भगत मार्ग, पुणे यांचे प्रतिनिधी ॲड.किरण गोविंद गंजकर यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. त्यांचे प्रतिपादन मान्य करण्यात येत असून आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रभाकर धोंडिबा कवडे
सर्व्हे नं.२६३, शिर्केनगर, मुंढवा, पुणे-३६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा धर्मादाय उपआयुक्त
पुणे विभाग, ढोले पाटील रोड, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त (सह)आयुक्त,
पुणे विभाग यांचे कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०२० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त (सह)आयुक्त,
पुणे विभाग यांचे कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे श्री.चंद्रकांत पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

एका सार्वजनिक न्यासाच्या मयत विश्वस्तांच्या जागी करावयाच्या नेमणुकी संदर्भात अपीलकर्ता श्री.प्रभाकर धोंडिबा कवडे यानी माहिती मागितल्याचे राज्य माहिती आयोगाकडील संचिकेचे अवलोकन करता दिसून येते. त्यांचा मूळ अर्ज आपल्या कार्यालयाला प्राप्त झालेला नाही. तथापि तो प्राप्त करून घेऊन माहिती देण्यात येईल, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त (सह)आयुक्त, पुणे विभाग यांचे कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे श्री.चंद्रकांत पाटील यानी केले. त्यानुसार त्यानी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.तुषार बाळासाहेब शिवले
नेताजी चौक, जॉली मित्र मंडळाजवळ, ता.पुरंदर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी, हडपसर, गांधी चौक,
हडपसर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी, उंड्री, ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०८१ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मंडल अधिकारी, हडपसर, गांधी चौक,
हडपसर, जि.पुणेश्रीमती निर्मला श्रीरंग मखरे

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी,
उंड्री, ता.हवेली, जि.पुणे श्री.सोमनाथ भगवंतराव भोरडे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

फेरफार प्रकरणातील कागदपत्रांच्या प्रती मागणारे पाच अर्ज अपीलकर्ता श्री.तुषार बाळासाहेब शिवले यानी केले होते. या अर्जांवरील उत्तराच्या अनुषंगाने एकच अपील त्यानी केले आहे. त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांचा शोध घेऊन प्रती पुरविण्यात आल्या आहेत. तशी त्यांची पोहोच आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा गाव कामगार तलाठी, उंड्री, ता.हवेली, जि.पुणे श्री.सोमनाथ भगवंतराव भोरडे व अपिलीय प्राधिकारी तथा मंडल अधिकारी, हडपसर, गांधी चौक, हडपसर, जि.पुणे श्रीमती निर्मला श्रीरंग मखरे यानी अपीलकर्त्यांची पोहोचदर्शक स्वाक्षरी असलेल्या पत्राच्या प्रतीसह केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अशोक धोंडीराम कुंभार
मु. पो. आकुर्ले, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा चेअरमन,
श्री केदारलिंग विकास सेवा संस्था मर्या. आकुर्ले,
ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
श्री केदारलिंग विकास सेवा संस्था मर्या. आकुर्ले,
ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३२७/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/१०/२०१० |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. अशोक धोंडीराम कुंभार यांच्या मागणीनुसार सर्व माहिती रजिस्टर्ड टपालाने पाठविली होती. परंतु त्यानी ती स्वीकारली नाही, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा सचिव,

श्री केदारलिंग विकास सेवा संस्था मर्या. आकुर्ले, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर श्री. नामदेव बंडु पाटील

यानी पूरक कागदपत्रांसह आयोगाला सादर केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मधील तरतुदीनुसार संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरते याचे कोणतेही पुरावे अपीलकर्त्यांनी सादर केलेले नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गहिनीनाथ शिवराम व्यवहारे
मु.पो.रोपळे बु., ता.पंढरपूर, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, कुकडी प्रकल्प मंडळ,
सिंचन भवन, मंगळवार पेठ, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सीमा माढा प्रकल्प विभाग,
भिमानगर, ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९९ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.६.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गहिनीनाथ शिवराम व्यवहारे
मु.पो.रोपळे बु., ता.पंढरपूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता, कुकडी प्रकल्प मंडळ,
सिंचन भवन, मंगळवार पेठ, पुणे श्री.भी.अ.पुरी

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, सीमा माढा प्रकल्प विभाग, भिमानगर, ता.माढा, जि.सोलापूर तत्कालीन-श्री.अे.आर.केंदळे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

नकाशात रस्ता दाखविलेला नसताना व आपल्याला नोटीस न देता जुन्या ओढ्याच्या जागेत रस्ता केला. त्यामुळे आपल्या शेतीचे नुकसान होत आहे व त्याबाबत कोणतीही माहिती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.गहिनीनाथ शिवराम व्यवहारे यानी केली.

संबंधित रस्ता हा वहिवाटीचा पाणंद रस्ता असून त्यासाठी भूसंपादन प्रक्रियेची गरज नाही. रस्ता झाल्यानंतर दहा वर्षांनी अपीलकर्त्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. त्याबाबतची सर्व माहिती दिली आहे, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सीमा माढा प्रकल्प विभाग, भिमानगर, ता.माढा, जि.सोलापूर श्री.अे.आर.केंदळे व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, कुकडी प्रकल्प मंडळ, सिंचन भवन, मंगळवार पेठ, पुणे श्री.भी.अ.पुरी यानी केले.

संपूर्ण कागदपत्रांसह अपीलकर्त्याच्या प्रतिपादनाबाबत वस्तुस्थिती तपासून अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, कुकडी प्रकल्प मंडळ, सिंचन भवन, मंगळवार पेठ, पुणे यानी १५ दिवसांत अपीलकर्त्यास कळवावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, कुकडी प्रकल्प मंडळ, सिंचन भवन, मंगळवार पेठ, पुणे यानी संबंधित रस्त्याबाबतची माहिती अपीलकर्त्यांना दि.१७.७.२०१० च्या पत्रान्वये दिल्याचा अहवाल, ७/१२

उताऱ्यांसह पूरक कागदपत्रांनिशी दि.२२.७.२०१० च्या पत्रान्वये सादर केला. मात्र ही माहिती चुकीची व खोटी असल्याची तसेच सरपंचांची सही खोटी असल्याचे सरपंचांच्या उत्तरासह नमूद करणारी तक्रार श्री.व्यवहारे यानी दि.१७.७.२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. परंतु सदर बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अनय अनंत जोशी
६, विक्रम अपार्टमेंट, परमहंसनगर, पौड रोड, कोथरूड, पुणे-३८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य वनसंरक्षक, पुणे,
वनविभाग, सेनापती बापट रोड,
बालभारतीशेजारी, सिम्बायोसीस कॉलेजसमोर, पुणे-४ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक वनसंरक्षक, पुणे,
वनविभाग, सेनापती बापट रोड,
बालभारतीशेजारी, सिम्बायोसीस कॉलेजसमोर, पुणे-४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२७१ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अनय अनंत जोशी
६, विक्रम अपार्टमेंट, परमहंसनगर, पौड रोड, कोथरूड, पुणे-३८

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पुणे जिल्ह्यातील वनपरिक्षेत्रांमधील प्राणीमित्र व प्राणीमित्र संघटनांच्या तक्रारीनुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, पुणे, वनविभाग, सेनापती बापट रोड, बालभारतीशेजारी, सिम्बायोसीस कॉलेजसमोर, पुणे-४ यांच्याकडे मागितली होती. परंतु नऊपैकी दोन मुद्दयांची व तीही विलंबाने माहिती दिली. गुन्हे झालेले असताना निरंक असे कळविले, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अनय अनंत जोशी यानी केली.

अनेक कार्यालयांकडील माहिती हवी असल्यास अपीलकर्ता यानी त्या त्या कार्यालयाकडून ती मागणे अधिक योग्य ठरेल. तथापि एकत्रित स्वरूपात अशी माहिती विषयाचे सार्वजनिक महत्त्व लक्षात घेता संबंधित कार्यालयाने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्ता यांच्या मूळ अर्जावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, पुणे, वनविभाग, सेनापती बापट रोड, बालभारतीशेजारी, सिम्बायोसीस कॉलेजसमोर, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक, पुणे, वनविभाग, सेनापती बापट रोड, बालभारतीशेजारी, सिम्बायोसीस कॉलेजसमोर, पुणे यानी दि.१०.२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(३) अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक, पुणे, वनविभाग, सेनापती बापट रोड, बालभारतीशेजारी, सिम्बायोसीस कॉलेजसमोर, पुणे यानी अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार माहिती संकलित करून दि.१०.२.२०११ पर्यंत नि:शुल्क पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :-२७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.तुकाराम पांडुरंग भोसले
मु.पवईमाळ, पो.पणदरे, ता.बारामती, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, बारामती, बारामती तहसील कार्यालय,
ता.बारामती, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती,
बारामती तहसील कार्यालय, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२७३ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.तुकाराम पांडुरंग भोसले
मु.पवईमाळ, पो.पणदरे, ता.बारामती, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती,
बारामती तहसील कार्यालय, ता.बारामती, जि.पुणे
विद्यमान-श्री.पी.बी.भोंग, तत्कालीन-श्री.बी.जे.गोरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जमिनीबाबत जैसे-थे परिस्थिती ठेवण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश असूनही बेकायदेशीर कार्यवाही केली. या संदर्भात दिलेल्या अर्जावर कार्यवाही न करता, अर्ज आढळत नसल्याचे कळविले. अभिलेख शोधून माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी देऊनही माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.तुकाराम पांडुरंग भोसले यानी केली.

दोन भावांमधील एकत्र जमीन खरेदीच्या संदर्भातील हा वाद सन १९६३ मधील असून सन १९६६ मधील शिधापत्रिकेची प्रत व त्या अनुषंगाने माहिती अपीलकर्ता मागत आहेत. वेळोवेळी मुद्देनिहाय उत्तर दिले आहे. या संदर्भातील संचिका उपलब्ध होत नव्हती, तथापि विशेष पथक तयार करून शोध घेऊन नोव्हेंबर २००९ मध्ये ती सापडली. तेव्हा देऊ केलेल्या कागदपत्रांच्या प्रती घेण्यास श्री.भोसले यानी नकार दिला. आयोगाकडील पत्रानंतर पुन्हा माहिती देऊ केली असता त्यानी घेण्यास नकार दिल्यामुळे नंतर रजिस्टर्ड टपालाने प्रती पाठविल्या. मूळ संचिका सोबत आणली असून त्यातील व अन्य अनुषंगिक माहिती त्याना हवी असल्यास अभिलेखानुसार देण्यात येईल, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती, बारामती तहसील कार्यालय, ता.बारामती, जि.पुणे श्री.बी.जे.गोरे यानी पूरक कागदपत्रांसह केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय मुरलीधर कदम
बादशहा ओट्याजवळ, जगताप आळी, जय महाराष्ट्र चौक,
मु.पो.सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन
महामंडळ, शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे-३७ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन
महामंडळ, शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६२ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संजय मुरलीधर कदम
बादशहा ओट्याजवळ, जगताप आळी, जय महाराष्ट्र चौक,
मु.पो.सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन
महामंडळ, शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे श्री.ए.जी.जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे विद्यमान-श्री.व्ही.वाय.रावळ, तत्कालीन-श्री.आर.डी.मोरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

श्री.सी.एन.करंबळेकर यानी वाहतूक निरीक्षक म्हणून केलेल्या कामाची माहिती आपण मागितली होती. ती दिली नाही. प्रत्यक्षात वाहतूक निरीक्षक पदाचे काम त्यानी केले नसून अन्य व्यक्तीने केले आहे. त्यामुळे राज्य परिवहन मंडळाचे आर्थिक नुकसान झाले आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.संजय मुरलीधर कदम यानी केले.

श्री.करंबळेकर यांच्याकडून नियमानुसार काम करून घेण्यात आले असून, तसे अपीलकर्त्यास विहित मुदतीत कळविले, कोणतीही माहिती लपविली नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे श्री.व्ही.वाय.रावळ यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यास आवश्यक अअसल्यास संबंधित अभिलेखांचे अवलोकन करून हव्या असलेल्या प्रती प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास संबंधित अभिलेखांचे यअवलोकन जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, शंकरशेठ रोड, स्वारगेट, पुणे यानी करू द्यावे व त्यांच्या लेखी मागणीनुसार हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क आकारून द्याव्यात.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अमरसिंह भगवानराव पाटील
उषा-१३, शिवाजी हौसिंग सोसायटी, सेनापती बापट रोड, पुणे-१६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, वाळवा,
ता.वाळवा, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाळवा,
ता.वाळवा, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०१३ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११- |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अमरसिंह भगवानराव पाटील
उषा-१३, शिवाजी हौसिंग सोसायटी, सेनापती बापट रोड, पुणे-१६

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाळवा,
ता.वाळवा, जि.सांगली श्री.मोहनराव बापूराव देशमुख

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

वारसा हक्क नोंदीच्या संदर्भात आपण मागितलेली माहिती न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.अमरसिंह भगवानराव पाटील यानी केली.

दि.१०.१०.१९३१ च्या फेरफार नोंदीबाबतची माहिती अपीलकर्ता सातत्याने मागत आले आहेत. अभिलेखात उपलब्ध असलेली सर्व माहिती वेळोवेळी दिली आहे. वारसाचे प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या मागणीनुसार नोंद करता येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाळवा, ता.वाळवा, जि.सांगली श्री.मोहनराव बापूराव देशमुख यानी केले.

संबंधित प्रकरणातील तहसीलदार व जिल्हाधिकारी यांच्या अहवालाच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वाळवा, ता.वाळवा, जि.सांगली यानी अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नारायण खंडू राक्षे
मु.पो.साळुंब्रे, ता.मावळ, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, वडगाव मावळ, तहसील कार्यालय,
मावळ, ता.मावळ, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, वडगाव मावळ,
तहसील कार्यालय, मावळ, ता.मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५१६ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नारायण खंडू राक्षे
मु.पो.साळुंब्रे, ता.मावळ, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, वडगाव मावळ,
तहसील कार्यालय, मावळ, ता.मावळ, जि.पुणे श्री.राजेश चव्हाण

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

जमिनीच्या नोंदीतील नाव कमी करण्याबाबतच्या अर्जावरील कार्यवाहीबाबतची माहिती मिळाली नाही, असे निवेदन अपीलकर्ता श्री.नारायण खंडू राक्षे यानी केले.

संबंधित अर्ज या विषयातील तक्रार प्रकरणी समाविष्ट केला असल्याचे अपीलकर्त्यास १५ दिवसांत कळविले, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, वडगाव मावळ, तहसील कार्यालय, मावळ, ता.मावळ, जि.पुणे श्री.राजेश चव्हाण यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. त्यानी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

डॉ.गणपत रघुनाथ निंबाळकर
७२१/२-ब/८, रघुनंदन, विकासनगर, **अपीलकर्ता**
नवी पेठ, पुणे-४११ ०३०

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य,**
पेमराज सारडा कॉलेज, बोरकर नगर, सारडा कॉलेज मैदान,
नगर- सावेडी रोड, अहमदनगर ४१४ ००१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,**
पेमराज सारडा कॉलेज, बोरकर नगर, सारडा कॉलेज मैदान,
नगर- सावेडी रोड, अहमदनगर ४१४ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४७/२००९/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** महाविद्यालयातून जानेवारी १९८६ ते फेब्रुवारी २००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या प्राध्यापकांची नावे, सेवानिवृत्ती दिनांक, अर्जीत रजांच्या सेवापुस्तकातीलन नोंदी, रजा रोखीकरण तदनुषंगिक एकूण १२ मुद्दे | |

**विवेचन**

अपीलकर्ता डॉ.गणपत रघुनाथ निंबाळकर यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलाच्या अनुषंगाने अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य, पेमराज सारडा कॉलेज, सारडा कॉलेज मैदान, अहमदनगर यानी दि.५.८.२००९ च्या पत्रान्वये सादर केलेला अहवाल अवलोकन करता अपीलकर्ता डॉ.निंबाळकर यांच्या याच विषयासंदर्भातील अपिलावर राज्य मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र यानी

दि.९.२.२००७ रोजी निर्णय दिला असल्याचे नमूद केले आहे. सदरची बाब लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.गणेश गबरू पवार
आपलेघर सोसायटी, स.नं.५६, नगररोड, चंदननगर, पुणे-१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कृषी सहसंचालक (आस्थापना), कृषी आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कृषी उपसंचालक (आस्थापना), कृषी आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०६२ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गणेश गबरू पवार
आपलेघर सोसायटी, स.नं.५६, नगररोड, चंदननगर, पुणे-१४

**अपिलीय प्राधिकारी** तथा कृषी सहसंचालक (आस्थापना), कृषी आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.अशाक बसवंत कवचाळे

**जन माहिती अधिकारी** तथा कृषी उपसंचालक (आस्थापना), कृषी आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.अशोक भगवान देसाई

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

एका अधिकाऱ्याची व त्याच्या नातेवाईकांची मत्ता व दायित्त्व प्रमाणपत्र, गोपनीय अहवाल याबाबतची माहिती आपण मागितली होती. ती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.गणेश गबरू पवार यानी केली.

गोपनीय अहवालाच्या प्रती उपलब्ध करून देण्याचे आदेश अपिलाच्या निर्णयात आपण दिले होते. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक (आस्थापना), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यानी अहवाल पुरविले. विभागीय चौकशीची प्रक्रिया पूर्ण झाली नसल्यामुळे संबंधित कागदपत्रांच्या प्रती दिलेल्या नाहीत. मालमत्ता व दायित्त्वाबाबतची विवरणपत्रे हे गोपनीय दस्तऐवज असून ते न देण्याच्या शासन निर्णयानुसार दिलेले नाहीत, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथाकृषी उपसंचालक (आस्थापना), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.अशोक भगवान देसाई व अपिलीय प्राधिकारी तथा कृषी सहसंचालक (आस्थापना), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे श्री.अशाक बसवंत कवचाळे यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.किशोर राजेंद्र खोमणे
जेजुरी रेल्वे स्टेशन रोड, खोमणेवस्ती, ता.पुरंदर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, पुरंदर, पुरंदर तहसील कार्यालय,
ता.पुरंदर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, पुरंदर,
पुरंदर तहसील कार्यालय, ता.पुरंदर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७५४ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.किशोर राजेंद्र खोमणे
जेजुरी रेल्वे स्टेशन रोड, खोमणेवस्ती, ता.पुरंदर, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, पुरंदर,
पुरंदर तहसील कार्यालय, ता.पुरंदर, जि.पुणे श्री.विश्वनाथ सोमा विरणक

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# <u>विवेचन</u>

जमिनीवरील नोंदीबाबतच्या कागदपत्रांची मागणी आपण केली होती. परंतु माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.किशोर राजेंद्र खोमणे यानी केली.

संबंधित माहिती जन माहिती अधिकारी तथा कामगार तलाठी, जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे यांच्या कक्षेतील असल्यामुळे श्री.खोमणे यांचा दि.२१.१.२०१० चा अर्ज दि.२२.१.२०१० रोजी कामगार तलाठ्यांकडे वर्ग करून तसे श्री.खोमणे याना कळविले, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पुरंदर, पुरंदर तहसील कार्यालय, ता.पुरंदर, जि.पुणे श्री.विश्वनाथ सोमा विरणक यानी नमूद केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. माहितीबाबत केलेल्या कार्यवाहीचा खुलासा गावकामगार तलाठी, जेजुरी यानी करणेआवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

# <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.राजू प्रल्हाद राऊत
राजर्षी शाहू कॉम्प्लेक्स, उद्योग भवन, रॉयल हेअर कटिंग सलून,
विंग नं.२, गाळा नं.१५, बारामती, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद,
ता.बारामती, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक, बारामती नगरपरिषद, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०१८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजू प्रल्हाद राऊत
राजर्षी शाहू कॉम्प्लेक्स, उद्योग भवन, रॉयल हेअर कटिंग सलून,
विंग नं.२, गाळा नं.१५, बारामती, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद,
ता.बारामती, जि.पुणे श्री.रवी रामचंद्र पवार

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक, बारामती नगरपरिषद,
ता.बारामती, जि.पुणे श्री.सुहास महादेव टांकसाळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपल्या व्यावसायिक गाळ्याला सन १९९७ पासून वीज पुरवठा केलेला नाही. वारंवार मागणी करूनही दखल घेतली जात नाही. याबाबतचा निर्णय त्वरित व्हावा. तसेच वीज नसताना गाळ्याला नगरपरिषदेने अवाजवी भाडे व दंड आकारणी केली आहे. ती कायदेशीर आहे का, याचा खुलासा व्हावा, अशी मागणी अपीलकर्ता श्री.राजू प्रल्हाद राऊत यानी केली व या संदर्भात योग्य माहिती दिली जात नसल्याची तक्रार त्यानी केली.

अपीलकर्त्यास सर्व माहिती देण्यात आली असून, वीज पुरवठ्यासाठी त्यांच्या मागणीप्रमाणे ना-हरकत प्रमाणपत्रही देण्यात आले आहे. आणखी कोणतीही माहिती हवी असल्यास देता येईल. प्रशासकीय कार्यवाहीविषयक मागण्यांचा विचार माहितीच्या अधिकारात करता येणार नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, बारामती नगरपरिषद, ता.बारामती, जि.पुणे श्री.सुहास महादेव टांकसाळे यानी केले.

अपीलकर्त्याची तक्रार व मागणी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही. त्यांना आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करून हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती योग्य ते शुल्क भरून प्राप्त करून घेता येतील. त्यानुसार त्यानी मागणी केल्यास जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, बारामती नगरपरिषद, ता.बारामती, जि.पुणे यानी संबंधित प्रती प्रमाणित करून देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय भिमाजी खरात
गजानन अपार्टमेंट, फ्लॅट नं.५, गल्ली नं.३,
गजानन महाराज नगर, नवीन सांगवी, पुणे-२७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहजिल्हा निबंधक वर्ग-१, मुद्रांक जिल्हाधिकारी,
पुणे शहर, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, हवेली क्र.३, मेगा सेंटर,
एल विंग, पहिला मजला, एल २१७, हडपसर, पुणे -२८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१८६ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |
| **३.** | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय भिमाजी खरात
गजानन अपार्टमेंट, फ्लॅट नं.५, गल्ली नं.३,
गजानन महाराज नगर, नवीन सांगवी, पुणे-२७

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहजिल्हा निबंधक वर्ग-१, मुद्रांक जिल्हाधिकारी,
पुणे शहर, पुणे श्री.बी.एम.कोळी

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, हवेली क्र.३, मेगा सेंटर,
एल विंग, पहिला मजला, एल २१७, हडपसर, पुणे श्री.सूर्यकांत मन्याळ

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

खरेदीखतासह दस्ताची प्रमाणित प्रत आपल्या मागणीनुसार मिळाली नसल्याचे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.दत्तात्रय भिमाजी खरात यानी केले.

सन १९९६ चा हा दस्त असून देणार व घेणार वेगळे आहेत. अपीलकर्त्याचा त्याच्याशी संबंध नाही. तरीही शोध घेतला असता, दस्ताचे शेवटचे पान नसल्याचे आढळले. तसे श्री.खरात याना कळविले, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक वर्ग-२, हवेली क्र.३, मेगा सेंटर, एल विंग, पहिला मजला, एल २१७, हडपसर, पुणे श्री.सूर्यकांत मन्याळ व अपिलीय प्राधिकारी तथा सहजिल्हा निबंधक वर्ग-१, मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, पुणे श्री.बी.एम.कोळी यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.बाळकृष्ण महादेव जुंदळे
मु.पो.लक्ष्मी दहिवडी, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर    अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मंगळवेढा,
ता.मंगळवेढा, जि.सोलापूर    उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, मंगळवेढा,
ता.मंगळवेढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५६९ / २०१० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१०.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मंगळवेढा,
ता.मंगळवेढा, जि.सोलापूर श्री.बी.आर.माळी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.बाळकृष्ण महादेव जुंदळे यांच्या दि.२६.२.२०१० च्या अर्जाला दि.९.३.२०१० च्या पत्रान्वये उत्तर दिले. माहिती घेऊन जाण्याविषयी पुन्हा दि.१२.३.२०१० च्या पत्रान्वये यूपीसीने कळविले. प्रथम अपील केलयानंतर त्यानी शुल्क भरले, परंतु माहिती नेण्यास आले नाहीत. दहा दिवसांत माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर यानी दिले. ते न आल्यामुळे तलाठ्यामार्फत माहिती पोहोचविली, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मंगळवेढा, ता.मंगळवेढा, जि.सोलापूर श्री.बी.आर.माळी यानी अपीलकर्त्यांची पोहोच असलेल्या प्रतीसह केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रामेश्वर पाटीलबा नागरे
मु.पो.कुळे, ता.मुळशी, **अपीलकर्ता**
जि.पुणे-४१२ १०८

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद, पुणे-४११००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
माध्यमिक विद्यालय कुळे,
ता.मुळशी, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१२६/२०१०/पुणे<br>३१४०/२०१०/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री.आर.एस.साबळे यांच्या लिपिकपदावरील नियुक्ती आदेशाची, सेवापुस्तकाची, लिपिक पदावरील सहाव्या वेतन आयोगानुसार केलेल्या वेतन निश्चितीची, लिपिक पदाच्या राजीनाम्याची सत्यप्रत व उपशिक्षक पदावरील रुजू अहवालाची साक्षांकित प्रत | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री.रामेश्वर पाटीलबा नागरे यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलांसोबतची कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता श्री.नागरे हे एकाच विषयाबाबत सातत्याने माहिती-मागणी अर्ज व अपिले करीत असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,

माध्यमिक विद्यालय, कुळे, ता.मुळशी, जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यानी अपीलकर्त्यास सर्व कागदपत्रे दाखवून आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती सशुल्क देणे योग्य ठरेल. एकाच व्यक्तीच्या एकाच विषयातील एकाच शाळा/संस्थेसंबंधीच्या अपिलांसाठी आयोगाचा वेळ व कार्यशक्ती यांचा अपव्यय न करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे.**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रामेश्वर पाटीलबा नागरे
मु.पो.कुळे, ता.मुळशी,
जि.पुणे-४१२ १०८ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद, पुणे-४११००१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१२५/२०१०/पुणे ३१२७/२०१०/पुणे ३१२८/२०१०/पुणे ३१२९/२०१०/पुणे ३१३०/२०१०/पुणे ३१३१/२०१०/पुणे ३१३२/२०१०/पुणे ३१३३/२०१०/पुणे ३१३४/२०१०/पुणे ३१३५/२०१०/पुणे ३१३६/२०१०/पुणे ३१३७/२०१०/पुणे ३१३८/२०१०/पुणे ३१३९/२०१०/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१. मामासाो मोहोळ विद्याविकास मंडळ, पुणे-३० या संस्थेच्या विविध विद्यालयांमधील शिक्षकांच्या नेमणुकीस मान्यता देण्यासंदर्भातील शिक्षकांच्या सेवा कालावधीबाबतच्या कागदपत्रांच्या छायाप्रती,<br>२. श्री.रामेश्वर पाटीलबा नागरे, उपशिक्षक यांच्या निलंबन काळातील वेतनाबाबतची माहिती<br>३. संस्थेतील विविध विद्यालयातील मान्यता प्राप्त तुकडया व शिक्षकांबाबतची माहिती<br>४. श्री.रामेश्वर पाटीलबा नागरे, उपशिक्षक यांच्या निलंबनासंदर्भातील कागदपत्रे | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.रामेश्वर पाटीलबा नागरे यानी राज्य माहिती आयोगाकडे एकाच वेळी केलेल्या एकूण १४ अपिलांसोबतची कागदपत्रे विचारात घेता अपीलकर्ता श्री.नागरे हे एकाच संस्थेबाबत व विषयाबाबत सातत्याने माहिती-मागणी अर्ज व अपिले करीत असल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे यानी अपीलकर्त्यास सर्व कागदपत्रे दाखवून आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती सशुल्क देणे योग्य ठरेल. एकाच व्यक्तीच्या एकाच विषयातील एकाच शाळा/संस्थेसंबंधीच्या अपिलांसाठी आयोगाचा वेळ व कार्यशक्ती यांचा अपव्यय न करण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे.**
**दि :- २८ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. रविंद्र शंकर फाटक
रा. ९/१७, सरस्वती मार्केट, अपीलकर्ता
इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
इचलकरंजी नगरपरिषद,
इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
पाणी पुरवठा, इचलकरंजी नगरपरिषद,
इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६००/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/१०/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br><br>**अपीलकर्ता -** श्री. रविंद्र शंकर फाटक, रा. ९/१७, सरस्वती मार्केट, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. नितीन देसाई<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा, इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. मनिष बाळकृष्ण पवार | |

| | |
|---|---|
| | **तत्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. सतीश दामोदर कुलकर्णी |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सन १९९५ नंतरची बांधकामे व औद्योगिक पाणी पुरवठा मंजूर करुन नंतर त्याचे घरगुती पाणीपुरवठयात रुपांतर केल्याच्या संदर्भातील माहिती आपण मागितली होती. परंतु ती परिपूर्ण मिळाली नाही. ५० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिहून घेऊन पाणी पुरवठा करण्यात आला असून औद्योगिक वसाहतीत घरगुती पाणीपुरवठा करता येत नसतानाही केला आहे. हे बेकायदेशीर आहे. तसेच संबंधित सर्वांचे पत्ते दिलेले नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. रविंद्र शंकर फाटक यानी केली.

अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार अभिलेखात स्वतंत्रपणे नोंदी केलेल्या नसतात. रजिस्टरवरुन माहिती संकलित करुन दिली. त्यात उपलब्ध असलेले पत्ते दिले . काही ठिकाणी पत्ते नसल्यामुळे देता आले नाहीत. सन १९९५ पासूनची माहिती संकलित करुन द्यावयाची असल्यामुळे विलंबाची पूर्वकल्पना देऊन अपीलकर्त्यास माहिती पुरविली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा, इचलकरंजी नगरपरिषद,इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. मनिष बाळकृष्ण पवार व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. नितीन देसाई यानी केले.

पाणीपुरवठयाच्या बेकायदेशीरपणाबाबतची अपीलकर्त्यांची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही. मात्र त्यांच्या तक्रारीचा गाभा लक्षात घेता कागदोपत्री उपलब्ध नसलेले पत्ते संबंधितांकडून प्राप्त करुन घेऊन जन माहिती अधिकारी यानी एक आठवडयात अपीलकर्त्यास पुरवावे असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा, इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. मनिष बाळकृष्ण पवार यानी त्वरित सादर करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. ११.२.२०११ पर्यंत जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा, इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. मनिष बाळकृष्ण पवार यानी आयोगाला सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुधाकर कृष्णा कुलकर्णी
११८५/ख-२, दुसरी गल्ली, राजारामपूरी, अपीलकर्ता
कोल्हापूर - ४१६ ००८.

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर

उत्तरदायी

**जन माहिती अधिकारी** तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४६/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/१०/२०१० |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सुधाकर कृष्णा कुलकर्णी यानी सेवानिवृत्तीवेतन प्रकरण मंजूर होण्याच्या अनुषंगाने मागितलेली माहिती देण्यात आली असून त्या संदर्भात मूळ प्रश्नाची सोडवणूक करण्याच्या

दृष्टीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्या पातळीवरुनही उपाययोजना करण्यात आल्याचे कागदपत्रांवरुन दिसून येते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती संजीवनी मनोहर पवार
सी २८, मनमोहन पार्क, बिबवेवाडी, पुणे - ३७ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक,
जिल्हा व सत्र न्यायाधीश भाऊसिंगजी रोड,
कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायाधीश भाऊसिंगजी रोड,
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११२८/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्रीमती संजीवनी मनोहर पवार
सी २८, मनमोहन पार्क, बिबवेवाडी, पुणे - ३७

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अधीक्षक,
जिल्हा व सत्र न्यायाधीश भाऊसिंगजी रोड,
कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. दत्तात्रय यशवंत जोशी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

दिवाणी दाव्यातील निकालाच्या अनुषंगाने आपण मागितलेली माहिती मिळाली नाही . जागेच्या ताब्याची कागदपत्रे दिली गेली नाहीत. सर्व संचिका आपण पाहिली आहे, असे प्रतिपादन अपीलकर्त्या श्रीमती संजीवनी मनोहर पवार यानी केले.

संबंधित प्रकरणात काम पाहण्यासाठी हजर राहण्यास कळविले असतानाही श्रीमती पवार आल्या नाहीत. तसेच संपूर्ण कागदपत्रे पाहून नकला हव्या असल्यास दिल्या जातील, असे स्पष्ट केल्यानंतर संचिका पाहूनही कोणत्याही नकला नको असल्याचे त्यानी सांगितले, असे जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायाधीश भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर श्रीमती व्ही. डी. गुणे व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक, जिल्हा व सत्र न्यायाधीश भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर श्रीमती पी. डी. देसाई यांचे लेखी निवेदन त्यांचे प्रतिनिधी श्री. दत्तात्रय यशवंत जोशी यानी सादर केले. त्यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. तसेच श्रीमती पवार यानी न्यायप्रक्रियेसंदर्भात भाष्य, अन्वयार्थ अशा स्वरुपाची विचारणा केली असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये ती 'माहिती' ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दगडू नामदेव पाटील
व्यवस्थापक, पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि. अपीलकर्ता
हुपरी मुख्य कार्यालय, हुपरी ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११९६/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. दगडू नामदेव पाटील
व्यवस्थापक, पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि.
हुपरी मुख्य कार्यालय, हुपरी ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक,
सहकारी संस्था, हातकणंगले, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. बी. एस. पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

मूळ अर्जदार श्री. सुरेश आर. गडगे यानी कर्जमाफी संदर्भातील माहिती मागितली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ च्या तरतूदीनुसार ही बँक घ्सार्वजनिक प्राधिकरणङ ठरत नसतानाही माहिती दिली.  कर्ज माफीची यादी बँकेने जाहीर सूचना फलकावरही लावली होती. मात्र बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसताना माहिती देण्याचे अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. अरुण पां. काकडे यानी दिलेले आदेश बेकायदेशीर असल्यामुळे रद्द करावे, अशी मागणी अपीलकर्ता श्री. दगडू नामदेव पाटील, व्यवस्थापक, पैसाफंड शेतकी सहकारी बँक लि. हुपरी मुख्य कार्यालय, हुपरी ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यानी केली.

अपीलकर्त्यांचे निवेदन व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या

नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ प्रकरणी दिलेला निर्णय लक्षात घेता अपिलीय प्राधिकारी यांचे आदेश वैध ठरत नाहीत. तसेच कायदा लागू नसतानाही बँकेने माहिती दिली आहे, हे उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, जि. कोल्हापूर श्री. अरुण

पां. काकडे यांचे दि. ३०/५/२००९ चे आदेश अवैध असल्यामुळे रद्द ठरविण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी  २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. परशराम बंडू पाटील
३१५, खेडे, ता. आजरा, जि. कोल्हापूर - ४१६ ५०५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसील कार्यालय, आजरा, ता. आजरा जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, आजरा, ता. आजरा जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२६०/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/१०/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, आजरा, ता. आजरा जि. कोल्हापूर श्री. बाबुराव शंकर पवार<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,<br>तहसील कार्यालय, आजरा, ता. आजरा जि. कोल्हापूर श्री.विष्णु केरबा नाईक | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जागेसंबंधातील बेकायदेशीर नोंदींबाबत आपण मागितलेली माहिती न मिळाल्याची तक्रार
अपीलकर्ता श्री. परशराम बंडू पाटील यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री. पाटील यानी मागितलेली माहिती आपल्या कार्यालयाच्या कक्षेतील नसून ग्रामपंचायत व पंचायत समिती यांच्याशी संबंधित असल्यामुळे अर्ज त्यांच्याकडे वर्ग करुन अपीलकर्त्यास तसे कळविले व ५१ पृष्ठांची माहिती दिली. जागेवरील नोंद बेकायदेशीर असल्याच्या संदर्भातील श्री. पाटील यांची तक्रार हा स्वतंत्र प्रशासकीय कार्यवाहीचा विषय असून त्या बाबतची प्रक्रिया सुरु आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, आजरा, ता.आजरा जि. कोल्हापूर श्री.विष्णु केरबा नाईक व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, आजरा, ता. आजरा जि. कोल्हापूर श्री. बाबुराव शंकर पवार यानी केले.

जागेवरील नोंदीबाबत दुरुस्ती करण्याची अपीलकर्त्याची मागणी असून सन १९८० पासून हा विषय चालू असल्याचे कागदपत्रांवरुन दिसते. 'नोंद दुरुस्त करण्याचे तत्कालीन सरपंच यानी ग्रामपंचायत हाजगोळी खुर्द व भावेश्वरी दूध संस्था अशा केलेल्या नोंदी कमी करुन त्या ठिकाणी सरकारी चावडी व सरकारी खुली जागा अशी नोंद करुन याजबद्दलचे दुरुस्त उतारे तहसीलदार कार्यालयाकडे पाठवत असलेबाबत दि. १५.९.२००३ रोजीच्या पत्रान्वये कळविले असून आजपावेतो दुरुस्ती केलेली नाही', असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, आजरा, ता. आजरा जि. कोल्हापूर श्री. बाबुराव शंकर पवार यानी लेखी निवेदनात नमूद केले आहे. या पत्राला सात वर्षे होऊन गेली असून याबाबत झालेल्या कार्यवाहीची माहिती सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्वाची आहे व ती अपीलकर्त्यास पर्यायाने नागरिकांना दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. सरपंच, ग्रामपंचायत हाजगोळी खुर्द, ता. आजरा यानी दि. १५.९.२००३ च्या पत्रान्वये कळविल्यानुसारच्या सद्यस्थितीची व त्याबाबत केल्या जात असलेल्या कार्यवाहीची माहिती अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, आजरा, ता. आजरा जि. कोल्हापूर

श्री. बाबुराव शंकर पवार यानी ११.२.२०११ पर्यंत अपीलकर्त्यास पुरवावी, व अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. संजय दिनकर गाडेकर
शाहूनगर नवीन कमानीजवळ, कागल, अपीलकर्ता
ता. कागल, जि. कोल्हापूर - ४१६ २१६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय उप निबंधक,
सहकारी संस्था (दुग्ध), पुणे विभाग, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३२/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४/१/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. संजय दिनकर गाडेकर
शाहूनगर नवीन कमानीजवळ, कागल,
ता. कागल, जि. कोल्हापूर - ४१६ २१६

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय उप निबंधक,
सहकारी संस्था (दुग्ध), पुणे विभाग, पुणे श्रीमती सोनाली रावल-ठाकूर

**जन माहिती अधिकारी**
कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि. कोल्हापूर यांचे प्रतिनिधी
श्री. रामकृष्ण बापूराव पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या स्थापनेपासूनची विविध स्वरुपाची माहिती आपण मागितली होती. परंतु संघाला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचे नमूद करुन कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि., कोल्हापूर यानी माहिती नाकारली व अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय उप निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), पुणे विभाग, पुणे यानी त्यांचे म्हणणे ग्राहय मानले. परंतु माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे दिली पाहिजे, अशी मागणी अपीलकर्ता श्री. संजय दिनकर गाडेकर यानी केली. श्री. गाडेकर यानी ढोबळ व अतिव्याप्त स्वरुपाची माहिती मागितली असून संघाला कोणतेही शासकीय भागभांडवल वा भरीव अर्थसहाय्य मिळत नाही. नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट कार्पो. कडून कर्ज मिळते व त्याची परतफेड केली जाते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मधील तरतुदींनुसार ही संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नाही व हा अधिनियम संस्थेला लागू होत नाही, असे प्रतिपादन संस्थेचे प्रतिनिधी श्री. रामकृष्ण बापूराव पाटील यानी केले. ते योग्य असल्यामुळे त्यानुसार निर्णय दिला असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय उप निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), पुणे विभाग, पुणे श्रीमती सोनाली रावल-ठाकूर यानी नमूद केले.

कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ लि. कोल्हापूर श्री.डी.व्ही. घाणेकर यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय उप निबंधक, सहकारी संस्था (दुग्ध), पुणे विभाग, पुणे श्रीमती सोनाली रावल-ठाकूर यांचा निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. संजय ज्ञानदेव नाधवडे
मु. पो. कौलव, ता. राधानगरी, अपीलकर्ता
जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,
कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३४/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४/१/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी संचालक,<br>कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.,<br>जि. कोल्हापूर श्री. राजेंद्रकुमार शांतीनाथ मिठारी | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला शासनाकडून कोणतेही भरीव अनुदान वा अर्थसहाय्य मिळत नसून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मधील तरतुदींनुसार ही

बँक सार्वजनिक प्राधिकरण ठरत नाही, अशी बँकेची भूमिका आहे. तथापि ही भूमिका कायम ठेवून व अपीलकर्ता श्री. संजय ज्ञानदेव नाधवडे यानी मागितलेली माहिती विस्तृत असतानाही रजिस्टर्ड टपालाने माहिती दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., जि. कोल्हापूर श्री. राजेंद्रकुमार शांतीनाथ मिठारी यानी केले. त्यांची भूमिका उल्लेखनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ.सकीना बाबुलाल शेख
पूर्व बारव, मुमताजनगर, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, जुन्नर नगरपरिषद, जुन्नर,
ता.जुन्नर, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगरपरिषद अभियंता, जुन्नर नगरपरिषद,
जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१६८ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ.सकीना बाबुलाल शेख
पूर्व बारव, मुमताजनगर, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, जुन्नर नगरपरिषद, जुन्नर,
ता.जुन्नर, जि.पुणे श्री.दीपक गेनभाऊ झिंजाड

**जन माहिती अधिकारी** तथा नगरपरिषद अभियंता, जुन्नर नगरपरिषद, जुन्नर,
ता.जुन्नर, जि.पुणे श्री.प्रभाकर रा.कर्पे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जुन्नर नगरपरिषदेच्या हद्दीतील सरकारी व नगरपरिषदेच्या मालकीच्या मोकळया जागांबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा नगरपरिषद अभियंता, जुन्नर नगरपरिषद, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे यानी दिली नाही. तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, जुन्नर यांच्याकडून माहिती घेण्यास त्यानी कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, जुन्नर नगरपरिषद, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे यानी अपिलाची दखल घेतली नाही. अद्यापपर्यंत आपल्याला कोणतीही माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्त्या सौ.सकीना बाबुलाल शेख यानी केली.

माहिती ज्या कार्यालयाच्या कक्षेतील आहे, ते कळविले. तरीही माहिती तयार केली, परंतु त्यानी संपर्क न साधल्यामुळे दिलेली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा नगरपरिषद अभियंता, जुन्नर नगरपरिषद, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.प्रभाकर रा. कर्पे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, जुन्नर नगरपरिषद, जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.दीपक गेनभाऊ झिंजाड यानी सांगितले. उपलब्ध सर्व माहिती अपीलकर्त्यांना त्वरित निःशुल्क द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक रामभाऊ गवळी
सर्व्हे नं.४७, धारेश्वर पूर्व बाजू, झुंबर पोकळे यांचे
लाकडाचे वखारीजवळ, धायरी, ता.हवेली, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, हवेली, ता.हवेली, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत धायरीगाव,
ता.हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४७३ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अशोक रामभाऊ गवळी
सर्व्हे नं.४७, धारेश्वर पूर्व बाजू, झुंबर पोकळे यांचे
लाकडाचे वखारीजवळ, धायरी, ता.हवेली, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, हवेली, ता.हवेली, जि.पुणे श्री.संजय रामचंद्र बोडरे

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत धायरीगाव,<br>ता.हवेली, जि.पुणे श्री.महेश कुंडलिक दळवी | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

मिळकतीच्या नोंदीबाबत मागितलेली माहिती मिळाली असून मागणीनुसार नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे तक्रार राहिलेली नाही, असे निवेदन अपीलकर्ता श्री.अशोक रा. गवळी यानी केले.

अधिकृत पत्रव्यवहारात भाषेच्या वापराबाबत शिष्टाचार पाळण्याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सुनिल प्रभाकर औटे
सुयोग निवास, सरपंच वस्ती, गोपाळवाडी रोड, दौंड, ता.दौंड, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, दौंड नगरपरिषद, ता.दौंड, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ओव्हरसियर (इंजिनिअर),
दौंड नगरपरिषद, ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५०९ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुनिल प्रभाकर औटे
सुयोग निवास, सरपंच वस्ती, गोपाळवाउी रोड, दौंड, ता.दौंड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, दौंड नगरपरिषद,
ता.दौंड, जि.पुणे श्री.कैलास बा.गावडे

**जन माहिती अधिकारी** तथा ओव्हरसियर (इंजिनिअर),
दौंड नगरपरिषद, ता.दौंड, जि.पुणे श्री.जिजाबा परशुराम दिवेकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

महाराष्ट्र राज्य, रस्ते विकास महामंडळाकडे दौंड शहरातील रस्त्याबाबत तीन मुद्दयांची माहिती आपण मागितली होती. त्यातील एका मुद्दयाची माहिती मुदतीत दिली. इतर दोन मुद्दयांची माहिती त्यानी व नगरपरिषदेनेही दिली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.सुनिल प्रभाकर औटे यानी केले.

महाराष्ट्र राज्य, रस्ते विकास महामंडळाकडून अर्ज आपल्याकडे वर्ग झाल्यानंतर अपीलकर्त्यांशी संपर्क साधला. परंतु ते माहिती घेण्यास आले नाहीत. माहिती तयार आहे. प्रकल्प राबविणे योग्य आहे की नाही, अशा स्वरूपाची विचारणा त्यानी केली आहे. ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तरीही स्पष्टीकरण दिले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा ओव्हरसियर (इंजिनिअर), दौंड नगरपरिषद, ता.दौंड, जि.पुणे श्री.जिजाबा परशुराम दिवेकर व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, दौंड नगरपरिषद, ता.दौंड, जि.पुणे श्री.कैलास बा.गावडे यानी माहितीच्या प्रतीसह नमूद केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २७ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.व्ही.एस.पवार
सिटीएस १२८८, स.नं.२अ, राजगुरू रस्ता, येरवडा, पुणे-६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कर आकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कर आकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २००९ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.व्ही.एस.पवार
सिटीएस १२८८, स.नं.२अ, राजगुरू रस्ता, येरवडा, पुणे-६

**अपिलीय प्राधिकारी** तथा कर आकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.विलास लक्ष्मण कानडे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कर आकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे श्री.वैभव भानुदास कडलाख

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जागेच्या कर आकारणीबाबत मागितलेली माहिती एक वर्षाने - काल देण्यात आली. जागेची कर आकारणी चुकीची केली आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.व्ही.एस.पवार यानी केली.

श्री.पवार यांच्या दि.३०.१२.२००९ च्या अर्जाला दि.६.१.२०१० रोजी अर्ज वर्ग करून उत्तर दिले. दि.१६.२.२०१० रोजी माहितीच्या तपशिलाबाबत त्याना कळविले. सन १९७९-८० मधील कागदपत्रांच्या प्रती त्यानी तपशील न देता मागितल्या होत्या. त्या शोधून दिल्या, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कर आकारणी व करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.वैभव भानुदास कडलाख व अपिलीय प्राधिकारी तथा कर आकारणी व करसंकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.विलास लक्ष्मण कानडे यानी पूरक कागदपत्रांसह केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जानेवारी २०११**

jan-१२११

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.पंडित धोंडिबा चव्हाण
बी-३०२, अक्षय गार्डन, संभाजीनगर, अप्पर धनकवडी, पुणे-४३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता, झोन क्र.४, नगर अभियंता कार्यालय, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, बाधंकाम नियंत्रण विभाग, पहिला मजला, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९०६ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.पंडित धोंडिबा चव्हाण
बी-३०२, अक्षय गार्डन, संभाजीनगर, अप्पर धनकवडी, पुणे-४३

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता, बाधंकाम नियंत्रण विभाग, पहिला मजला, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.नरेंद्र कुलकर्णी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

इमारतीच्या नकाशात दर्शविण्यात आलेल्या रस्त्यामध्ये बेकायदेशीपणे केलेल्या अतिक्रमणाबाबत माहितीची व ते पाडून रस्ता खुला करण्याची मागणी आपण केली होती. ती अद्याप मिळालेली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.पंडित धोंडिबा चव्हाण यानी केले.

अपीलकर्त्यांची तक्रार व संभाव्य कार्यवाही याबाबतचा अभिप्राय देता येणार नाही. परंतु संपूर्ण संचिका अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्यात येईल व त्यातील हवी असलेली माहिती देता येईल, असे श्री.चव्हाण याना लेखी कळविले होते, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बाधंकाम नियंत्रण विभाग, पहिला मजला, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.नरेंद्र कुलकर्णी यानी नमूद केले.

अपीलकर्त्यांची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. तथापि अतिक्रमणविषयक तक्रारींबाबतच्या वस्तुस्थितीची नेमकी माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे. ती लेखी द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.३१.१२.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास कळविल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बाधंकाम नियंत्रण विभाग, पहिला मजला, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.नरेंद्र कुलकर्णी यानी दि.३.१.२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती उषा कृष्णाजी साळवे
गोपाळ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, प्लॉट नं.ए-८,
वॉर्ड-ए, भांगरवाडी, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद,
ता.मावळ, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नगररचनाकार, लोणावळा नगरपरिषद,
ता.मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८२० / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्रीमती उषा कृष्णाजी साळवे
गोपाळ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, प्लॉट नं.ए-८,
वॉर्ड-ए, भांगरवाडी, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद,
ता.मावळ, जि.पुणे श्री.योगेश रा.गोडसे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक नगररचनाकार, लोणावळा नगरपरिषद,
ता.मावळ, जि.पुणे श्री.शरद भा.पाटील

| | |
|---|---|
| | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

विकसकाने बेकायदशीरपणे मंजूर नकाशा डावलून सहकारी गृहनिर्माण संस्थेचे बांधकाम केले. त्याचा सुधारित नकाशा व नव्याने दाखल केलेल्या नकाशाबरोबरचे कव्हरिंग लेटर याच्या प्रती अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे यानी आदेश देऊनही मिळाल्या नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्रीमती उषा कृष्णाजी साळवे यानी केली.

उपलब्ध सर्व कागदपत्रांच्या प्रती तत्कालीन जन माहिती अधिकारी यानी अपीलकर्त्यास दिल्या. सुधारित नकाशासोबत कव्हरिंग लेटर दिलेले नसल्यामुळे त्याची प्रत देणे शक्य नाही. अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानुसार सुधारित नकाशाची प्रतही दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार, लोणावळा नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, लोणावळा नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे श्री.योगेश रा.गोडसे यानी केले.

अपीलकर्त्यांना आवश्यक असल्यास संबधित संचिकेचे अवलोकन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक नगररचनाकार, लोणावळा नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे यानी करू द्यावे त्यातील आवश्यक कागदपत्रांच्या प्रती लेखी मागणी नोदवून योग्य ते शुल्क भरून अपीलकर्त्यास प्राप्त करून घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महंमद बाबुमिया फरास
३४४, बजरंग आळी, मदार मोहल्ला, भोर नगरपरिषद, ता.भोर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, भोर नगरपरिषद, ता.भोर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा (१)लेखा विभाग, (२)आरोग्य विभाग,
(३)आस्था विभाग, भोर नगरपरिषद, ता.भोर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५६८ / २०१०/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, भोर नगरपरिषद,
ता.भोर, जि.पुणे श्री.डी.एन.रेडके

**जन माहिती अधिकारी** तथा (१)लेखा विभाग, (२)आरोग्य विभाग,
(३)आस्था विभाग, भोर नगरपरिषद, ता.भोर, जि.पुणे
श्री.दिलीप रामकृष्ण भारंबे, श्री.ला.य.गायकवाड, श्री.अ.मा.थोरात

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.महंमद बाबुमिया फरास यानी कायदेशीर मुद्दयांविषयीचे अभिप्राय, खुलासा, बिलाबाबत आक्षेप व काही माहिती अशा स्वरूपाची मागणी करणारा अर्ज केला होता. त्याना विहित मुदतीत उत्तर दिले. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येणाऱ्या 'माहिती'ची पूर्तता जन माहिती अधिकारी तथा (१)लेखा विभाग, (२)आरोग्य विभाग, (३)आस्था विभाग, भोर नगरपरिषद, ता.भोर, जि.पुणे यानी केली असल्याचे मुद्देनिहाय निष्कर्षानुसार नमूद करून तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, भोर नगरपरिषद, ता.भोर, जि.पुणे यानी अपील निकाली काढले, असे जन माहिती अधिकारी तथा (१)लेखा विभाग, (२)आरोग्य विभाग, (३)आस्था विभाग, भोर नगरपरिषद, ता.भोर, जि.पुणे अनुक्रमे श्री.दिलीप रामकृष्ण भारंबे, श्री.ला.य.गायकवाड, श्री.अ.मा.थोरात व विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, भोर नगरपरिषद, ता.भोर, जि.पुणे श्री.डी.एन.रेडके यानी नमूद केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती हिराबाई राजाराम शिंदे
स.नं.२/३, सह्याद्रीनगर, शेवटच्या बसस्टॉपजवळ, धनकवडी, पुणे-४३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त, विभागीय कार्यालय क्र.१,
पुणे महानगरपालिका, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकारी, कर्वे रोड क्षेत्रिय कार्यालय,
गरवारे कॉलेजजवळ, पुणे-४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४४५ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्रीमती हिराबाई राजाराम शिंदे यांचे प्रतिनिधी श्री.शांताराम राजाराम शिंदे
स.नं.२/३, सह्याद्रीनगर, शेवटच्या बसस्टॉपजवळ, धनकवडी, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा क्षेत्रिय अधिकारी, कर्वे रोड क्षेत्रिय कार्यालय,
गरवारे कॉलेजजवळ, पुणे श्री.नितीन रमेश उदास

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

मिळकतीच्या वारस नोंदी प्रकरणी विधी सल्लागारांच्या अभिप्रायाची प्रत अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे यानी आदेश देऊनही मुदतीत मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्त्या श्रीमती हिराबाई राजाराम शिंदे (वय ८० वर्षे ) यांचे चिरंजीव श्री.शांताराम राजाराम शिंदे यानी केली.

मूळ अर्जानुसार विहित मुदतीत माहिती दिली. त्यांचा माहिती-मागणीचा अर्ज दि.१५.४.२००९ चा असून अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, विभागीय कार्यालय क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्या आदेशानुसार विधी सल्लागारांचा अभिप्राय दि.९.७.२००९ रोजी घेतला व त्यानंतर नाव लावून दिले. 'सर्व कागदपत्रे मिळाली व नाव हस्तांतर केल्याचे तारखेची दुरूस्ती करून मिळाली. माझे पूर्ण समाधान झाले आहे,' असे अपीलकर्त्यांच्या याच प्रतिनिधींनी दि.७.११.२००९ रोजी लेखी दिले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अधिकारी, कर्वे रोड क्षेत्रिय कार्यालय, गरवारे कॉलेजजवळ, पुणे श्री.नितीन रमेश उदास यानी श्री.शिंदे यांच्या या पत्राच्या प्रतीसह नमूद केले. ते लक्षात घेता अपीलकर्त्यांची तक्रार निरर्थक आहे. विधी सल्लागारांच्या अभिप्रायाची प्रत अद्यापही हवी असल्यास योग्य ते शुल्क भरून ते घेऊ शकतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अनंत मारूती शिंदे
३३, जेधेनगर, बिबवेवाडी, पुणे-३७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (भूसंपादन अधिकारी व व्यवस्थापक),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहा.अभियंता (भूमी व जिंदगी),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४४३/ २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अनंत मारूती शिंदे
३३, जेधेनगर, बिबवेवाडी, पुणे-३७

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (भूसंपादन अधिकारी व व्यवस्थापक),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.सुधाकर तेलंग

**जन माहिती अधिकारी** तथा सहा.अभियंता (भूमी व जिंदगी),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.शिवाजी लंके

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पूरग्रस्ताना दिलेल्या जागांसंदर्भातील आपण मागितलेली माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.अनंत मारूती शिंदे यानी केली.

श्री.शिंदे यांच्या मूळ अर्जाला उत्तर पाठविले होते. त्यानी केलेल्या अपिलाच्या सुनावणीसाठीही कळविले होते. परंतु ही दोन्ही पत्रे मिळाली नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. मुद्दा क्र.२ सारख्या अभिप्रायांची व अन्वयार्थाची मागणी वगळता आमच्या विभागाकडीलच नव्हे, तर अन्य विभागांकडील माहितीही ते येतील त्यावेळी समक्ष संचिका दाखवून देण्यात येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (भूमी व जिंदगी), पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.शिवाजी लंके व अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त (भूसंपादन अधिकारी व व्यवस्थापक), पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे श्री.सुधाकर तेलंग यानी केले. त्यानुसार अपीलकर्त्यांनी समक्ष संपर्क साधून एका आठवड्यात माहिती प्राप्त करून घ्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु त्यानुसार कोणतीही माहिती मिळाली नसल्याची तक्रार श्री.शिंदे यानी दि.२०.१.२०११ च्या पत्राद्वारे आयोगाकडे केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहा.अभियंता (भूमी व जिंदगी), पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे यानी दि.१५.२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. गणपतराव रावजी पाटील
मु. पो. टोप, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, कोल्हापूर
ताराबाई पार्क, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
श्री महालक्ष्मी महिला सहकारी दूध व्यावसायिक संस्था मर्या. टोप,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११२७/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/१०/२००९ |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. गणपतराव रावजी पाटील यांचे दि. ३.३.२०१० रोजी निधन झाले असून तसा अहवाल अपील क्र. २०३६/२००९/ कोल्हापूर मध्ये जन माहिती अधिकारी तथा सचिव, श्री कल्लेश्वर सहकारी दूध व्यावसायिक संस्था मर्या. टोप, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर यांच्या दि. १९.३.२०१०

च्या पत्रान्वये आयोगाला अहवाल सादर करण्यात आला आहे.  तसेच प्रस्तुत अपिलातील संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसूनही माहिती देण्यात आली असल्याचे कागदपत्रावरुन दिसून येते.

अपीलकर्त्यांच्या याच विषयावरील अपील क्र. २०३६/२००९/ कोल्हापूर मध्ये राज्य माहिती आयोगाने आदेश दिले आहेत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २८ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ.लिना अनिल रेवणकर
गुरूप्रसाद, फ्लॅट नं.३४, रामनगर कॉलनी, बावधन, पुणे-२१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता (वि.यो.क्र.१),
पुणे महानगरपालिका, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता (वि.यो.क्र.१), पुणे महानगरपालिका, पुणे

<table>
<tr><td>१</td><td>अपील क्रमांक</td><td>९३७ / २००९ / पुणे</td></tr>
<tr><td>२</td><td>सुनावणीची तारीख</td><td>दि.११.११.२०१०</td></tr>
<tr><td colspan="3">३. उपस्थित<br><br>अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता (वि.यो.क्र.१),<br>पुणे महानगरपालिका, पुणे श्री.साहेबराव दांडगे<br><br>जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता (वि.यो.क्र.१),<br>पुणे महानगरपालिका, पुणे श्री.हेमंत रामचंद्र मोरे</td></tr>
<tr><td>४</td><td colspan="2">माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.</td></tr>
</table>

## विवेचन

मिळकतीचे मालकी हक्क व एचइएमआरएल (High Explosive Material Reserach Laboratory) नोटिफिकेशन या अनुषंगाने मागितलेली अचूक माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्त्या सौ.लिना अनिल रेवणकर यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

सौ.रेवणकर यांच्या दि.४.५.२००९ च्या अर्जाला दि.१९.५.२००९ च्या पत्रान्वये उत्तर दिले व दि.२०.५.२००९ रोजी माहिती दिली. याच विशिष्ट विषयाबाबत सौ.लिना अनिल रेवणकर व श्री.अनिल विश्राम रेवणकर सातत्याने अर्ज व अन्य पत्रव्यवहार करीत आले असून आतापर्यंत तीसहून अधिक वेळा त्याना माहिती देण्यात आली आहे. त्यांच्या जागेतून रस्ता दिल्याबद्दलची त्यांची मूळ तक्रार आहे. त्याबाबतच्या चार संचिकांमधील माहिती वेगवेगळ्या प्रकारे ते मागत असतात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता (वि.यो.क्र.१), पुणे महानगरपालिका, पुणे श्री.हेमंत रामचंद्र मोरे व अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता (वि.यो.क्र.१), पुणे महानगरपालिका, पुणे श्री.साहेबराव दांडगे यानी केले. सौ. व श्री.रेवणकर यांचे अर्ज, पत्रव्यवहार व दिलेली उत्तरे यांच्या प्रतीसह संपूर्ण तपशील दि.२१.१२.२०१० च्या पत्रान्वये अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता (वि.यो.क्र.१), पुणे महानगरपालिका, पुणे श्री.साहेबराव दांडगे यानी आयोगाला सादर केला. ही कागदपत्रे पाहता एकाच विषयाबाबत पुनः पुन्हा अर्ज व अपिले करून सर्व यंत्रणांचा वेळ व कार्यशक्ती यांचा अपव्यय न करण्याची समज अपीलकर्ता सौ.लिना अनिल रेवणकर व श्री.अनिल विश्राम रेवणकर याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी गंगाराम चांधेरे
श्री गणेश केरोसीन व अधिकृत दुकानदार संघटना,
स.नं.१९९/२०५, विमाननगर, पुणे-१४ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी(फिरते पथक),
पुणे, शिवाजीनगर, पुणे- ५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडल अधिकारी ई विभाग,
शिवाजीनगर धान्य गोदाम, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२१३ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजी गंगाराम चांधेरे
श्री गणेश केरोसीन व अधिकृत दुकानदार संघटना,
स.नं.१९९/२०५, विमाननगर, पुणे-१४

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी(फिरते पथक),
पुणे, शिवाजीनगर, पुणे श्री.ज्ञानेश्वर जवंजाळ

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा परिमंडल अधिकारी ई विभाग,<br>शिवाजीनगर धान्य गोदाम, पुणे श्री.श्रीकांत शिंदे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

परिमंडल अधिकारी ई विभाग यांच्याकडे त्यांच्या कक्षेतील सर्व स्वस्त धान्य दुकानदारांनी दोन वर्षांपूर्वी जमा केलेल्या शिधापत्रिकाविषयक कागदपत्रांची तपासणी करू देण्याची मागणी आपण केली होती. परंतु त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा परिमंडल अधिकारी ई विभाग, शिवाजीनगर धान्य गोदाम, पुणे श्री.पी.के.वीर यानी कार्यवाही केली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शिवाजी गंगाराम चांधेरे यानी केली.

कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करून देण्याचे आदेश आपण दिल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी(फिरते पथक), शिवाजीनगर, पुणे श्री.ज्ञानेश्वर जवंजाळ यानी नमूद केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा परिमंडल अधिकारी ई विभाग, शिवाजीनगर धान्य गोदाम, पुणे श्री.पी.के.वीर यानी माहिती-मागणी अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबतचा शास्तीविषयक म्हणण्यासह खुलासा तीन दिवसांत करावा, तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी तथा परिमंडल अधिकारी ई विभाग, शिवाजीनगर धान्य गोदाम, पुणे यानी अपीलकर्त्यांना सर्व कागदपत्रे अवलोकनासाठी उपलब्ध करून देऊन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती सशुल्क उपलब्ध करून द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा परिमंडल अधिकारी ई विभाग, शिवाजीनगर धान्य गोदाम, पुणे श्री.पी.के.वीर यानी दि.३१.१२.२०१० च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. संबंधित कागदपत्रे उपलब्ध करून देण्याबाबत तत्कालीन सर्व पुरवठा निरीक्षकांना आपण लेखी कळविले होते. तदनंतर ई परिमंडळ कार्यालय

स्थलांतरित झाले असून तेथे सर्व कागदपत्रे ठेवण्यात आली आहेत. अपीलकर्ता व त्यांचे अन्य सहकारी अनेकदा कार्यालयात येत असूनही या कागदपत्रांच्या तपासणीची मागणी त्यानी नंतर केली नाही, असे श्री.वीर यानी खुलाशात नमूद केले आहे. त्यांचा हा खुलासा मान्य करण्यात येत आहे. तथापि संबंधित अपीलकर्त्यांना विहित मुदतीत लेखी उत्तर दिले जाणे, तसेच माहितीबाबत अन्य कर्मचाऱ्यांना सूचना दिल्यास जन माहिती अधिकारी म्हणून पाठपुरावा करणे आवश्यक आहे, याची समज तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा परिमंडल अधिकारी ई विभाग, शिवाजीनगर धान्य गोदाम, पुणे श्री.पी.के.वीर याना देण्यात येत आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.तानाजी माधवराव सोनवणे
मु.पो.राहू, ता.दौंड, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक वनसंरक्षक (प्रा), पुणे वन विभाग,
सेनापती बापट रोड, पुणे-४ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, दौंड तहसील कार्यालय
आवार, ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४१४ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.तानाजी माधवराव सोनवणे
मु.पो.राहू, ता.दौंड, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, दौंड तहसील कार्यालय
आवार, ता.दौंड, जि.पुणे श्री.दयानंद जगन्नाथ घाडगे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सन १९६५-६६ मधील पगारपत्रकाची व कर्मचाऱ्याच्या बदलीबाबतची माहिती आपण मागितली होती, ती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.तानाजी माधवराव सोनवणे यानी केली.

पगारपत्रकांच्या प्रती आपल्या कार्यालयात नसून विभागीय कार्यालयाकडे असतात. माहिती जुनी असल्यामुळे शोधून उपलब्ध झाली, तेवढी सोबत आणली आहे. अपीलकर्त्यास लेखी कळविलेले नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, दौंड तहसील कार्यालय आवार, ता.दौंड, जि.पुणे श्री.दयानंद जगन्नाथ घाडगे यानी केले.

जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, दौंड तहसील कार्यालय आवार, ता.दौंड, जि.पुणे यांचे निवेदन लक्षात घेऊनही त्यानी अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तर देणे आवश्यक होते, ते केलेले नाही. म्हणून ते शास्तीस पात्र ठरतात. त्याबाबत त्याना काही म्हणावयाचे असल्यास त्यानी लेखी निवेदन द्यावे व सोबत आणलेली माहिती अपीलकर्त्यास निःशुल्क पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. कोणतेही लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, दौंड तहसील कार्यालय आवार, ता.दौंड, जि.पुणे श्री.दयानंद जगन्नाथ घाडगे यानी अद्यापपर्यंत सादर केलेले नाही. याचा अर्थ त्याना काहीही म्हणावयाचे नाही. तसेच दि.७.१.२०११ रोजी दिलेली माहिती अर्धवट स्वरूपाची असल्याची तक्रार अपीलकर्ता यानी दि.१०.१.२०११ च्या पत्राद्वारे आयोगाकडे केली. मात्र त्याबाबतचा तपशील त्यानी दिलेला नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कार्यवाही विहित मुदतीत न केल्याबद्दल जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, दौंड तहसील कार्यालय आवार, ता.दौंड, जि.पुणे श्री.दयानंद जगन्नाथ घाडगे याना समज म्हणून रूपये ५०००/- प्रतिकात्मक शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्ती त्याना मार्च २०११ मध्ये मिळणाऱ्या फेब्रुवारी २०११ या महिन्याच्या वेतनातून वसूल करून '००७, इतर

प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक(प्रा), पुणे वनविभाग, सेनापती बापट रोड, पुणे-४ यानी करून अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महादेव विठोबा हाडवळे
मु.औटी मळा, पो.साकोरी तर्फे बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण,
पाषाण रोड, चव्हाणनगर, पुणे-८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
जुन्नर विभाग, ता.जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.महादेव विठोबा हाडवळे
मु.औटी मळा, पो.साकोरी तर्फे बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण,
पाषाण रोड, चव्हाणनगर, पुणे श्री.रामनाथ पोकळे

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
जुन्नर विभाग, ता.जुन्नर, जि.पुणे प्रतिनिधी श्री.आर.एस.देवकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जमिनीच्या मोजणी प्रकरणात चुकीच्या नोंदी केल्याबद्दल संबंधिताविरूध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पोलीस अभियोक्ता यांच्याकडून मागविलेल्या अभिप्रायाची प्रत आपण मागितली होती. परंतु एका पोलीस अभियोक्त्यांचा अभिप्राय दडपून गुन्हा होत नसल्याचा अभिप्राय दुसऱ्या पोलीस अभियोक्त्यांकडून घेतला. त्याबाबतची योग्य माहिती व मूळ अहवालाची प्रत जाणीवपूर्वक दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.महादेव विठोबा हाडवळे यानी केली.

आधीचा अहवाल गहाळ झाला असल्याचे व नंतरचा अहवालही त्याच स्वरूपाचा असल्याचे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर विभाग, ता.जुन्नर, जि.पुणे यांचे प्रतिनिधी  श्री.आर.एस.देवकर यानी केले. अपीलकर्त्यास २० दिवसांत माहिती देण्याचे आदेश आपण दिले होते. बिनतारी संदेश यंत्रणेद्वारेही कळविले होते. तथापि जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर विभाग, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.एस.एस.शिर्के यानी याबाबतच्या नेमक्या वस्तुस्थितीची माहिती आजतागायत दिलेली नाही, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पाषाण रोड, पुणे श्री.रामनाथ पोकळे यानी केले.

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर विभाग, ता.जुन्नर, जि.पुणे यानी नेमकी माहिती देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा व विलंबाचा शास्तीबाबतच्या म्हणण्यासह खुलासा दोन दिवसांत आयोगाला सादर करावा. तसेच पोलीस अभियोक्त्यांचा मूळ अहवाल उपलब्ध न होण्याच्या संदर्भात चौकशी करून अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पाषाण रोड, पुणे यानी १५ दिवसांत अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तथापि जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर विभाग, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.एस.एस.शिर्के यांचा अहवाल आयोगास अद्याप प्राप्त झालेला नाही. ही बाब गंभीर आहे. अपिलीय प्राधिकारी यानी दि.२६.४.२०१० च्या पत्रान्वये अहवाल सादर केला. 'पोलीस अभियोक्ता चव्हाणनगर, पुणे ग्रामीण यांचे कार्यालयात भूकरमापक श्री.ए.एम.मुल्ला यांचेविरुध्द गुन्हा दाखल होतो अगर कसे, याबाबतचा अहवाल पोलीस हवालदार लांडे यानी तयार करून नारायणगाव पोलीस ठोण्याचे बारनिशी मपोशि/१२९३ घुले यांच्याकडे दिला होता. मपोशि १२९३ घुले हिने बारनिशी जावक रजिस्टरला नोंद करून जा.क्र.२७२३/०९ दि.२३.७.२००९ रोजी नोंद करून

सदरचा अहवाल व इतर टपाल पोलीस ठाण्याचे सहाय्यक फौजदार श्री.काटे यांच्याकडे पोलीस अभियोक्ता चव्हाणनगर, पुणे ग्रामीण यांच्या कार्यालयात देण्यासाठी समक्ष दिला होता. परंतु सहा.फौजदार श्री.काटे यानी सदरचा अहवाल व इतर टपाल पोलीस अधीक्षक कार्यालयातील नोंदणी शाखेत टपाल पेटीत ठेवून दिले होते व त्यांची पोहोच घेतलेली नाही. सध्या सदर अहवालाचा शेध घेतला असता, तो मिळून आलेला नाही. सुमारे पाच महिने झाले असताना पोलीस अभियोक्ता, पुणे ग्रामीण यांच्याकडून सदर अहवालावरून पोलीस अभियोक्ता यांच्याकडून वेळेत अभिप्राय न आलेने व अर्जदार यानी एकसारखा तगादा लावल्याने त्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर विभाग यांच्या कार्यालयात विधी अधिकारी यांची नेमणूक झाल्याने सपोनि श्री.कदम यानी विधी अधिकारी, जुन्नर विभाग यांच्याकडे दुसरा अहवाल तयार करून जा.क्र.२९/२०१०, दि.६.१.२०१० अन्वये पाठविण्यात आला होता. गैरअर्जदार यांच्या नोंद केलेल्या जबाबामध्ये व थोडीफार तफावत आढळून येते. परंतु दोन्ही अहवालामध्ये जोडण्यात आलेले वादग्रस्त जमिनीचे नकाशे भूमी अभिलेख कार्यालयाकडील पत्रव्यवहाराच्या प्रती, यामध्ये काहीही फरक आढळून येत नाही. त्यामुळे विधी अधिकारी किंवा पोलीस अभियोक्ता याना अवलोकनासाठी व अभिप्रायासाठी आवश्यक असणारे नमूद कागदपत्रे ही एकच आहेत. त्यामुळे तक्रारदाराच्या मूळ तक्रारीच्या वस्तुस्थितीत काहीही फरक झालेला नाही. जरी गैरअर्जदार यानी वेगवेगळे जबाब दिलेले असले तरी सदरचा वाद हा जमिनीचा असल्याने भूमी अभिलेख कार्यालयाकडील कागदपत्रे महत्त्वाची आहेत व दोन्ही अहवालासोबत पाठविलेली कागदपत्रे एकच आहेत,'असे या अहवालात नमूद केले आहे. ते विचारात घेता सहाय्यक फौजदार श्री.काटे यानी केलेल्या कार्यवाहीची छाननी करून अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पाषाण रोड, पुणे यानी कारवाई करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, जुन्नर विभाग, ता.जुन्नर, जि.पुणे श्री.एस.एस.शिर्के यानी आयोगाच्या मौखिक आदेशानुसार अद्याप अहवाल सादर केलेला नाही. त्याबाबत शास्ती व शिस्तभंगविषयक कारवाई का करू नये, याचा खुलासा दि.१५.२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(३) अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पाषाण रोड, पुणे यांच्या उपरोक्त अहवालात नमूद केल्यानुसार संबंधित कागदपत्रांबाबत योग्य ती दक्षता न घेतल्याबद्दल सहा.फौजदार श्री.दत्तात्रय सिताराम काटे यांच्यावर अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पाषाण रोड, पुणे यानी शिस्तभंगाची कारवाई करावी व अनुपालन अहवाल आयोगाला एक महिन्यात सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक रामभाऊ गवळी
सर्व्हे नं.४७, धारेश्वर पूर्व बाजू, झुंबर पोकळे यांचे
लाकडाचे वखारीजवळ, धायरी, ता.हवेली, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी,
पुणे उपविभाग यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८७२ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अशोक रामभाऊ गवळी
सर्व्हे नं.४७, धारेश्वर पूर्व बजू, झुंबर पोकळे यांचे
लाकडाचे वखारीजवळ, धायरी, ता.हवेली, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे डॉ.जयश्री कटारे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी,<br>पुणे उपविभाग यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे<br>विद्यमान-श्री.अरूण स्वामी, तत्कालीन-श्री.वाय.बी.भुरकुंडे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आपले नोंदणीकृत खरेदीखत असताना तलाठी व मंडल अधिकारी यानी बेकायदेशीरपणे फेरफार नोंद रद्द केली. त्या अनुषंगाने जमीनविषयक व अन्य काही नियमांचा तपशील व काही मुद्दयांचा खुलासा आपण जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे यांच्याकडे मागितला होता. परंतु माहिती वेळेत मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अशोक रामभऊ गवळी यानी केली.

श्री.गवळी यानी विविध अधिनियमांमधील कलमांची माहिती मागितली होती. सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेली ही माहिती जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे यांच्याकडेच आहे, असे गृहित धरता येणार नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या व्याख्येत ती येत नसल्याचे कळविले. अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे यानी हा निर्णय ग्राह्य ठरविला, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.वाय.बी.भुरकुंडे यानी केले.

सार्वजनिकरीत्या उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यांच्याच कक्षेतील असल्याचे मानता येणार नाही. त्यामुळे ती देणे जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे यांच्यावर बंधनकारक ठरणार

नाही. तथापि सहकार्याचा भाग म्हणून जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग यांचे कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे यानी संबंधित नियमावलीची योग्य ती किंमत घेऊन / प्रतींचे योग्य ते शुल्क आकारून अपीलकर्त्यास ती उपलब्ध करून देणे योग्य होईल. अपीलकर्त्यास पाठविलेल्या पत्राच्या जावक बारनिशीतील नोंदीची छायाप्रत अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे यानी सादर करावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे डॉ.जयश्री कटारे यानी दि.२८.१२.२०१० च्या पत्रान्वये सदर प्रत सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ. अन्नपूर्णा अशोक जाधव
घर नं. ३०५२, हॉटेल निलकमल शेजारी,
संकेश्वर रोड, गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
गडहिंग्लज नगरपरिषद , ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी,**
गडहिंग्लज नगरपरिषद , ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११८८/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** सौ. अन्नपूर्णा अशोक जाधव
घर नं. ३०५२, हॉटेल निलकमल शेजारी, संकेश्वर रोड, ता. गडहिंग्लज,
जि. कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. अशोक यशवंतराव जाधव

**तत्कालीन अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
गडहिंग्लज नगरपरिषद , ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर श्री. संजय हि. हेरवाडे

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
गडहिंग्लज नगरपरिषद , ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर श्री. आर.पी.पाटील

| | |
|---|---|
| | **तत्कालीन जन माहिती अधिकारी,**<br>गडहिंग्लज नगरपरिषद , ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर श्री. एस.जी.केसरकर |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

गडहिंग्लज नगरपरिषदेने सन १९९७ मध्ये दिलेल्या एका बांधकाम परवानगी संदर्भातील कागदपत्रांच्या प्रती आपण मागितल्या होत्या. परंतु ठरावाची नक्कल वगळता कोणतीही माहिती मिळाली नाही. संबंधितांनी जाणूनबुजून कागदपत्रे गहाळ केली असून त्यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्त्या सौ. अन्नपूर्णा अशोक जाधव यानी केली.

संबंधित मिळकत सामायिक होती व तत्कालीन नगरपरिषद अभियंता श्री.एस.एस.भोसले यांच्याकडेच या संदर्भातील संचिका होती. परंतु शोध घेऊनही ती सापडत नसल्यामुळे माहिती देता आली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, गडहिंग्लज नगरपरिषद , ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर  श्री. राजेंद्र ब. तेली यानी केले. अपीलकर्त्यास कागदपत्रे मिळवून देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यानी केला आहे. तथापि वादग्रस्त विषयातील संचिका अभिलेखात उपलब्ध न होणे ही बाब एका बांधकामापुरती मर्यादित नसून प्रातिनिधिक महत्वाची आहे, हे लक्षात घेता संबंधितांना संचिका सादर करण्याबाबत पुन्हा कळवून त्यानुसार पूर्तता न झाल्यास सार्वजनिक अभिलेख गहाळ करण्याबद्दल महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये जतन न केल्याप्रकरणी संबंधितांवर फौजदारी गुन्हा नोंदवावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले, असे विद्यमान मुख्य अधिकारी यानी संबंधित खुलाशांच्या प्रतींसह अहवालात नमूद केले आहे. वरील बाबी लक्षात घेता अपीलकर्त्यास संबंधित कागदपत्र उपलब्ध होण्याबाबत अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, गडहिंग्लज नगरपरिषद , ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर यांच्या पातळीवरुन कारवाई केली जाणे आवश्यक आहे.

नगरपरिषदेच्या अभिलेखात उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यांना देण्यात आल्या. अन्य कागदपत्रांच्या नकला देण्याबाबत तत्कालीन नगर परिषद अभियंता, श्री. एस. एस. भोसले दि. १.१.२००९, १२.१.२००९ रोजी त्याना कळविले असूनही त्यानी कागदपत्रे दिलेली

नाहीत. त्यामुळे त्याना  दि.२०.५.२००९ रोजी नोटीस दिली. तसेच ज्यांना बांधकाम परवानगी दिली त्यांनाही स्वतंत्र नोटिसा दिल्या.

आयोगाच्या आदेशानुसार सन १९९७ नंतर गडहिंग्लज नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामध्ये काम केलेले नगरपरिषदेकडील १) श्री. डी.एच. खलीफ २) श्री. एन. एस. मिश्रकोटी ३) श्री. अे. एम. चव्हाण ४) सौ. ए. ए. दिवाण ५) श्री. एस. जी. केसरकर ६) श्री. एस. एस.तावडे ७) श्री. एस. डी. मोरे ८) श्री. एम. एल. शिंदे यांना दि. १६/१०/२०१० रोजी नोटिसा देऊन खुलासा मागणी करणेत आला. सदर नोटिशींपैकी अ.क्र. १ ते ७ लोकांनी खुलासा सादर केलेला आहे. तसेच श्री. एस.एस.भोसले, नगरपरिषद अभियंता, इचलकरंजी (तत्कालीन नगरपरिषद अभियंता गडहिंग्लज) याना सुध्दा दि. १६/१०/२०१० रोजी रजिस्टर्ड पोस्टाने आयोगाचे आदेश कळविले. 'अपील क्र. ११८८/२००९ मध्ये राज्य माहिती आयुक्त, पुणे खंडपीठ यानी दिलेल्या आदेशाप्रमाणे सदरची कागदपत्रे/ फाईल नगरपरिषदेमार्फत अपिलार्थीना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावीत. सदर कागदपत्रे/ फाईल १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावीत. सदर कागदपत्रे नगरपरिषदेकडे शोधूनही न मिळाल्यास किंवा तुमचेकडे उपलब्ध न झ ाल्यास, कागदपत्रे गहाळ केल्याबद्दल फौजदारी गुन्हा नोंद करणेत येईल', असेही त्याना कळविण्यात आले होते. सदरची नोटिस रजिस्टर्ड पोस्टाने पाठविणेत आली होती. परंतु सदर रजिस्टर्ड नोटिस त्यानी स्वीकारली नसलेने परत आलेली आहे. याशिवाय श्री. एस.एस.भोसले सध्या इचलकरंजी नगरपरिषद येथे कार्यरत असलेने दि. १६/१०/२०१० रोजीची नोटीस त्याना पोच करुन त्याबाबत इकडे कळविणेस मुख्याधिकारी इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी याना इकडील जा.क्र. न.व.शि.जा/१३/६९३/२०१० दि. १६/१०/२०१० अन्वये कळविणेत आले होते. सदर नोटीस त्यानी श्री. भोसले याना दिनांक २१/१०/२०१० रोजी लागू करुन त्याबाबतची पोच घेऊन त्यांचेकडील दि. २५/१०/२०१० रोजीच्या पत्रान्वये इकडे पाठविलेली आहे. श्री. सयाजीराव सखाराम भोसले, नगरपरिषद अभियंता, इचलकरंजी (तत्कालीन नगरपरिषद अभियंता) यानी काल त्यांचे  दि. २/१२/२०१० रोजी व दि. १६/१०/२०१० रोजीच्या नोटिशीस उत्तर देऊन खुलासा केला आहे. सदर खुलाशात मा. राज्य माहिती आयुक्त, पुणे यानी सदर अपील सुनावणीच्या वेळी दिलेल्या आदेशाची प्रत/ इतिवृत्ताची प्रत मागणी केली आहे. त्यानंतर पुन्हा आपले म्हणणे सादर करीत आहे, असे कळविलेले आहे, असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री. संजय हेरवाडे यानी लेखी व तोंडी नमूद केले. श्री. एस.एस.भोसले यांची दि. ३ जानेवारी २००९ रोजी इचलकरंजी येथे बदली झाली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, गडहिंग्लज नगरपरिषद , ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर श्री. संजय हि. हेरवाडे यानी उपरोक्त अहवालासोबत नमूद केलेल्या कागदपत्रांच्या प्रती सादर केल्या आहेत. हा अहवाल व सर्व कागदपत्रे पाहता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगरपरिषद अभियंता, गडहिंग्लज जि. कोल्हापूर श्री. एस. एस. भोसले यांचा संदर्भित संचिकेसंदर्भातील लेखी खुलासा विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, गडहिंग्लज नगरपरिषद, ता.गडहिंग्लज, जि. कोल्हापूर श्री. राजेंद्र तेली यानी घ्यावा व अपीलकर्ता यानी माहितीची मागणी केलेल्या संचिकेच्या जतनाच्या कालावधीनुसार ती प्राप्त न होण्यास जबाबदार असणारे कर्मचारी/ अधिकारी यांच्यावर महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ अन्वये फौजदारी गुन्हा नोंदवावा व अनुपालन अहवाल दि. १५.३.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अब्दुलमजीद रसूल मुल्ला
जैबून मंझील, प्लॉट नं. ८/३, अपीलकर्ता
विजयनगर कॉलनी, कदमवाडी रोड, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त (।),
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप शहर अभियंता,
वि.का.क्र.४, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५५/२०१०/ कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. अब्दुलमजीद रसूल मुल्ला
जैबून मंझील, प्लॉट नं. ८/३,
विजयनगर कॉलनी, कदमवाडी रोड, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा उप शहर अभियंता,
वि.का.क्र.४, कोल्हापूर महानगरपालिका,
जि. कोल्हापूर श्री. नेत्रदिय सरनोबत

सहा. आयुक्त, विधी विभाग, कोल्हापूर महानगरपालिका,
जि. कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री. अशोक बाळकृष्ण पोवार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

'आवश्यक असणारी माहिती मला उपलब्ध झाली असून माझी कोणतीही तक्रार नाही', असे तोंडी व लेखी प्रतिपादन अपीलकर्ता श्री. अब्दुलमजीद रसूल मुल्ला यानी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**२८ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. महावीर बापूसाो कापसे
७२२/१, बी वॉर्ड, रविवार पेठ, अपीलकर्ता
जैन गल्ली, कोल्हापूर ४१३ ०१२

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा धर्मादाय उप आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर विभाग,
१०७९/ख, वसंत प्लाझा, तिसरा मजला, बागल चौक, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर विभाग,
१०७९/ख, वसंत प्लाझा, तिसरा मजला, बागल चौक, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४८/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४/१/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. महावीर बापूसाो कापसे
७२२/१, बी वॉर्ड, रविवार पेठ, जैन गल्ली, कोल्हापूर ४१३ ०१२

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर विभाग,
१०७९/ख, वसंत प्लाझा, तिसरा मजला,
बागल चौक, कोल्हापूर श्री. अरुण मधुकर सडोलीकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

श्री.चंद्रप्रभा दिगंबर जिन मंदिर ट्रस्ट या धर्मादाय संस्थेच्या स्थापनेपासून सन २००९ पर्यंतची माहिती आपण मागितली होती. ती अपुरी मिळाली. त्यातीलही काही माहिती दिशाभूल करणारी आहे. ट्रस्टकडून माहिती घेण्यास सांगण्याऐवजी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रशासकीय अधिकारात ती मिळवून आपल्याला देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. महावीर बापूसाो कापसे यानी केले.

आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती दिली. अपिलीय प्राधिका-यांच्या निर्णयानुसार माहिती देण्याबाबत संदर्भित ट्रस्टलाही कळविले. परंतु श्री. कापसे यानी आपल्याकडे माहिती मागितलेली नाही, असे ट्रस्टच्या अध्यक्षांचे म्हणणे आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर श्री. अरुण मधुकर सडोलीकर यानी पूरक कागदपत्रांसह केले.

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर विभाग, बागल चौक, कोल्हापूर श्री. अरुण मधुकर सडोलीकर व अपिलीय प्राधिकारी तथा धर्मदाय उप आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, कोल्हापूर विभाग, बागल चौक, कोल्हापूर श्री. आर.एस.पाटील यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र. ५२९४/२००८ प्रकरणी दिलेल्या निर्णयानुसार सार्वजनिक संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. तसेच जन माहिती अधिका-यांनी अपीलकर्त्यांच्या मूळ अर्जातील संस्थेकडील माहिती मागवून वा ढोबळमानाने नमूद केलेल्या तपशिलाची माहिती संकलित करुन अपीलकर्त्यास देणे बंधनकारक नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी मोहन भोसले
मु.पो.आळंदी देवाची, वडगाव रस्ता, राम मंदिरासमोर, ता.खेड, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद,
आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कनिष्ठ अभियंता, बांधकाम विभाग,
आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९०९ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजी मोहन भोसले
मु.पो.आळंदी देवाची, वडगाव रस्ता, राम मंदिरासमोर, ता.खेड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद,
आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे श्री.धनंजय कोळेकर

**जन माहिती अधिकारी** तथा कनिष्ठ अभियंता, बांधकाम विभाग,
आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे श्री.एस.के.गिरमे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आळंदी नगरपरिषदेने सन १९६६ मध्ये तयार केलेल्या विकास आराखड्याबाबतची माहिती शुल्क भरूनही अपुरी मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.शिवाजी मोहन भोसले यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री.भोसले यानी दि.२७.४.२०१० च्या अर्जान्वये मागितलेली माहिती दि.२५.५.२०१० च्या पत्रान्वये मुद्देनिहाय दिली. सन १९६६ मध्ये विकास आराखडा तयार केलेला नसल्यामुळे त्यातील अनेक मुद्दे गैरलागू असूनही त्याबाबतची वस्तुस्थिती कळविली. याच अनुषंगाने त्यानी मागितलेली अतिरिक्त माहितीही विविध विभागांकडून त्या त्या वेळी देण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, बांधकाम विभाग, आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे श्री.एस.के.गिरमे व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे श्री.धनंजय कोळेकर यानी श्री.भोसले यांचे अर्ज व देण्यात आलेल्या उत्तरांच्या प्रतींसह केले. ते लक्षात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मधु दुनिचंद सबनानी
११२/१/१, राधाकृष्ण कॉलनी, हीना पॅलेससमोर, नढेनगर, काळेवाडी, पुणे-१७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (जकात),
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य आयातकर अधीक्षक,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९७३ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मधु दुनिचंद सबनानी
११२/१/१, राधाकृष्ण कॉलनी, हीना पॅलेससमोर, नढेनगर, काळेवाडी, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य आयातकर अधीक्षक,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.शांताराम नामदेव राऊत

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जकातीच्या संदर्भातील आपण विचारलेल्या मुद्दयांचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी तथा मुख्य आयातकर अधीक्षक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (जकात), पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांच्या पातळीवरून झाले नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मधु दुनिचंद सबनानी यानी केली.

गृहितावर आधारित प्रश्न व त्या अनुषंगाने संभाव्य कार्यवाही अशा स्वरूपाची विचारणा श्री.सबनानी यानी केली होती. ती प्रश्नोत्तराच्या स्वरूपात असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये देता येत नसल्याचे कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्य आयातकर अधीक्षक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे श्री.शांताराम नामदेव राऊत यानी केले.

जन माहिती अधिकारी तथा मुख्य आयातकर अधीक्षक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. तथापि जकात आकारणीबाबतची प्रक्रिया अपीलकर्त्यास लेखी स्वरूपात कळवावी, तसेच त्याबाबतच्या नियमावलीची प्रत अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास योग्य ते शुल्क आकारून पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दादासाहेब लक्ष्मण जगताप
कालठण नं.१, ता.इंदापूर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, इंदापूर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कालठण नं.१,
ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २००६ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दादासाहेब लक्ष्मण जगताप
कालठण नं.१, ता.इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर, जि.पुणे श्री.एस.व्ही.भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कालठण नं.१,
ता.इंदापूर, जि.पुणे श्री.ए.के.कुंभार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

ग्रामसभा, मागासवर्गीय अनुदानातून केलेला खर्च आदिंबाबतची आपण मागितलेली माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दादासाहेब लक्ष्मण लगताप यानी केली.

अपीलकर्ता श्री.जगताप यांच्या दि.३१.५.२०१० च्या अर्जाला दि.२४.६.२०१० व दि.२.७.२०१० अशा दोन पत्रान्वये माहिती तयार असल्याचे व शुल्क भरण्यास कळविले. त्यानी संपर्क साधला नाही. सुनावणीच्या दोन तारखा देऊनही ते हजर राहिले नाहीत. शुल्क भरल्यास केव्हाही माहिती देता येईल, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कालठण नं.१, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.ए.के.कुंभार व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर, जि.पुणे श्री.एस.व्ही.भोसले यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही रास्त असून अपीलकर्त्यास माहिती आवश्यक असल्यास योग्य ते शुल्क आकारून पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार शुल्क कळविल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर, जि.पुणे श्री.एस.व्ही.भोसले यानी आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सूर्यकांत रामचंद्र सैद
द्वारा-सौ.सुनंदा विजय काळे
जनता विद्या मंदिर विद्यालय, घोडेगाव, ता.आंबेगांव, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती आंबेगाव,
घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती आंबेगाव कार्यालय,
घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९२७ / २००९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सूर्यकांत रामचंद्र सैद
द्वारा-सौ.सुनंदा विजय काळे
जनता विद्या मंदिर विद्यालय, घोडेगाव, ता.आंबेगांव, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती आंबेगाव,
घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.राहुल शांताराम काळभोर

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती आंबेगाव कार्यालय,
घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे री.मुरलीधर धोंडू मेमाणे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

माहिती मिळाली, परंतु विलंबाने दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सूर्यकांत रामचंद्र सैद यानी केली.

श्री.सैद यानी मागितलेली माहिती सन १९८५ ते १९९० या काळातील होती. ग्रामपंचायतीकडे त्यानी केलेला मूळ अर्ज उपलब्ध झाला नव्हता. विस्तार अधिकाऱ्यांकडे त्यानी केलेल्या अर्जानंतर जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती आंबेगाव कार्यालय, घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे यानी स्वतः ग्रामपंचायतीत जाऊन जुनी कागदपत्रे शोधून अपीलकर्त्यास माहिती दिली, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती आंबेगाव, घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.राहुल शांताराम काळभोर यानी केले. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती आंबेगाव कार्यालय, घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे श्री.मुरलीधर धोंडू मेमाणे यानी केलेली कार्यवाही योग्य व उल्लेखनीय आहे. त्याना शास्ती करण्याची अपीलकर्त्याची मागणी योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विलास दत्तात्रय बारवकर
चाकण, विद्याधाम कॉलनी, ता.खेड, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पाषाण, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
खेड विभाग, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१३३ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१५.७.२०१० |
| **३. उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** श्री.विलास दत्तात्रय बारवकर<br>चाकण, विद्याधाम कॉलनी, ता.खेड, जि.पुणे ी<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,<br>खेड विभाग, जि.पुणे श्री.भरत रामराव पाटील | | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

विनापरवाना लकी ड्रॉ बाबतची खरी माहिती जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, खेड विभाग, जि.पुणे श्री.भरत रामराव पाटील यानी दिली नाही. वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे

संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी तपास केला नाही व तपास न करताच आरोपींना कारवाईपासून वाचविण्यासाठी खोटा अहवाल दिला. या अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी. अधिकाऱ्यांनी आपल्याला व आपल्या कुटुंबियांना दिलेला त्रास, चौकशीतील पक्षपातीपणा याबाबत मुख्य सचिव अथवा उपसचिव यांच्याकरवी चौकशी व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.विलास दत्तात्रय बारवकर यानी लेखी व तोंडी केली.

श्री.बारवकर यानी तक्रार केल्यानंतर चौकशी करून संबंधितांविरूध्द गुन्हा दाखल होऊन दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे. उपलब्ध कागदपत्रांनुसार सर्व माहिती दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, खेड विभाग, जि.पुणे श्री.भरत रामराव पाटील यानी केले.

दि.१८.५.१९९९ व दि.२८.५.१९९९ अशा दोन दिवशी लकी ड्रॉ काढण्यात आले. त्यातील एक बेकायदेशीर असल्याची श्री.बारवकर यांची तक्रार असून, त्या संदर्भातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन त्याना करू द्यावे व त्याना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती निःशुल्क पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. अपीलकर्त्याच्या अन्य तक्रारी व मागण्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, खेड विभाग, जि.पुणे यानी दि.१५.२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करून त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अंकुश तुकाराम थोरात
६०१, शनिवार पेठ, मार्केट यार्ड, रत्नागिरी, धान्य गोडाऊन शेजारी,
कराड, ता.कराड, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४६ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे<br>श्रीमती अरूणा विजय चव्हाण | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.अंकुश तुकाराम थोरात यानी संग्रहालय सहाय्यक, मानवशास्त्र या पदाबाबतची विस्तृत माहिती दि.४.१.२०१० च्या पत्रान्वये मागितली होती. तीन कार्यालयांकडून ती प्राप्त करून घेऊन

दि.२५.१.२०१० च्या पत्रान्वये नियमावलीसह पुरविली. त्या अनुषंगाने काही प्रश्न उपस्थित करून स्पष्टीकरणात्मक विचारणा श्री.थोरात यानी प्रथम अपिलात केली. सुनावणीला ते उपस्थित नव्हते. परंतु त्याना अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यानी दिले. त्यानुसार ते आले नाहीत. नेमकेपणाने विचारणा केल्यास आवश्यक माहिती त्यांना देण्यात येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यानी केले. त्यानी केलेली कार्यवाही रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. विजय यशवंत घाडगे
७१८ क/ख/ए वॉर्ड, संभाजी नगर, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जल अभियंता (पाणी पुरवठा विभाग),
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९३/२०१०/ कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४/१/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. विजय यशवंत घाडगे
७१८ क/ख/ए वॉर्ड, संभाजी नगर, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा जल अभियंता (पाणी पुरवठा विभाग),
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. सी.एम.कागलकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

जानेवारी २००५ पासूनची पाणीगळतीबाबतची माहिती व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ च्या अंमलबजावणीबाबतची माहिती आपण मागितली होती. छापील स्वरुपात ही माहिती दर्शनी भागात जाहीर करणे, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या नावाचे फलक लावणे आवश्यक आहे. मागितलेली माहिती फ्लॉपीमध्ये द्यावी, अशी आपली मागणी असून अंदाजे शुल्क कळविल्यामुळे भरले नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. विजय यशवंत घाडगे यानी केले. च

श्री. घाडगे यानी मागितलेली माहिती अत्यंत विस्तृत स्वरुपाची असून त्याना हवे त्याप्रमाणे त्यातील आकडेवारीचे वेगळे संकलन करु देता येणार नाही. ज्या लेजरमध्ये त्याना हवा असलेला तपशील आहे, त्याची ८००० पृष्ठे होतात. ती देण्याची तयारी दर्शविली होती. तसेच अभिलेख अवलोकनासाठी समक्ष येऊन मागणी केल्यास त्यानुसार प्रती देण्यात येतील, असेही कळविले होते. संगणकीय फ्लॉपीच्या स्वरुपात माहिती तयार करुन देण्याची त्यांची मागणी असून ते शक्य नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा जल अभियंता (पाणी पुरवठा विभाग), कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. सी.एम.कागलकर यानी केले.

जन माहिती अधिकारी तथा जल अभियंता (पाणी पुरवठा विभाग), कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. सी.एम.कागलकर व अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. गणेश एन. देशमुख यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रतींची मागणी करुन, योग्य ते शुल्क भरुन प्राप्त करुन घेता येतील. मात्र कोल्हापूर महानगरपालिकेतील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ च्या अंमलबजावणीबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट होणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ च्या कोल्हापूर महानगरपालिकेने

केलेल्या अंमलबजावणीबाबतचा अहवाल सार्वजनिक प्राधिकरणाचे प्रमुख म्हणून आयुक्त, महानगरपालिका कोल्हापूर यानी दि. १५.२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**२९ जानेवारी २०११**

प्रत - आयुक्त, महानगरपालिका, कोल्हापूर याना पुढील कारवाईसाठी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.भास्कर का.गायकवाड
बी-६, अेबीसी एम्प्लॉईज सहकारी हौसिंग सोसायटी,
पवनानगर, चिंचवड, पुणे-३३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.),
पंचायत समिती, संगमनेर, जि.अहमदनगर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मौजे निगांव,
ता.संगमनेर, जि.अहमदनगर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९२४ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.भास्कर का.गायकवाड
बी-६, अेबीसी एम्प्लॉईज सहकारी हौसिंग सोसायटी,
पवनानगर, चिंचवड, पुणे-३३

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.),
पंचायत समिती, संगमनेर, जि.अहमदनगर श्री.जे.टी.सोनवणे

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मौजे निगांव, ता.संगमनेर, जि.अहमदनगर विद्यमान-श्री.एस.के.लोहकरे तत्कालीन-श्रीमती आर.बी.चव्हाण | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

ग्रामपंचायतीच्या आर्थिक कारभारासंबंधी व दलित वस्तीतील कामासंबंधी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मौजे निगांव, ता.संगमनेर, जि.अहमदनगर व अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), पंचायत समिती, संगमनेर, जि.अहमदनगर यांच्या पातळीवर मिळाली नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मौजे निगांव, ता.संगमनेर, जि.अहमदनगर श्रीमती आर.बी.चव्हाण यानी गैरप्रकार लपविण्यासाठी माहिती दिली नाही. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी अशी मागणी अपीलकर्ता श्री.भास्कर का.गायकवाड यानी केली.

श्री.गायकवाड यानी दि.४.११.२००८ रोजी पंचायत समितीकडे अर्ज केला होता. तो ग्रामपंचायतीकडे आल्यावर उपलब्ध माहिती दि.२६.१२.२००८ रोजी पाठविली. आपली वैयक्तिक परिस्थिती चांगली नव्हती व पाच महिने रजेवर होते. आपल्याला उपलब्ध झालेल्या कागदपत्रांनुसार माहिती दिली, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मौजे निगांव, ता.संगमनेर, जि.अहमदनगर श्रीमती आर.बी.चव्हाण यानी केले.

आपण दि.१८.५.२००९ रोजी ग्रामसेवकपदाचा कार्यभार स्वीकारला. श्रीमती चव्हाण यानी दि.१६.४.२०१० रोजी कार्यभार हस्तांतरण केल्यानंतर त्याच दिवशी माहिती दिली, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मौजे निगांव, ता.संगमनेर, जि.अहमदनगर श्री.एस.के.लोहकरे यानी केले.

मूळ कार्यभार श्रीमती चव्हाण यांच्याकडेच होता व माहिती देण्याबाबत त्यानी विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही, त्यामुळे त्या शास्तीला पात्र आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), पंचायत समिती, संगमनेर, जि.अहमदनगर श्री.जे.टी.सोनवणे यानी केले.

विलंबाचे व माहिती न देण्याचे स्पष्टीकरण तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मौजे निगांव, ता.संगमनेर, जि.अहमदनगर श्रीमती आर.बी.चव्हाण देऊ शकल्या नाहीत.

शास्तीविषयक जाणीव दिल्यानंतरही त्यानी कोणताही खुलासा केलेला नाही. तसेच विहित मुदतीत उत्तर/माहिती दिल्याचा पुरावा त्यानी सादर केलेला नाही. त्यामुळे त्या शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) अपीलकर्ता श्री.भास्कर का. गायकवाड याना माहिती मुदतीत न देणे, कागदपत्रे हस्तांतरित न केल्यामुळे माहिती देण्यास सुमारे दीड वर्षाचा कालावधी लावण्यास कारणीभूत ठरणे याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत मौजे निगांव, ता.संगमनेर, जि.अहमदनगर श्रीमती आर.बी.चव्हाण याना रूपये २५००० शास्ती करण्यात येत आहे. ही शास्ती त्याना मार्च २०११, एप्रिल २०११, मे २०११, जून २०११ व जुलै २०११ मध्ये मिळणाऱ्या फेब्रुवारी २०११, मार्च २०११, एप्रिल २०११, मे २०११, जून २०११ या महिन्यांच्या वेतनातून पाच हप्त्यात वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)'या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), पंचायत समिती, संगमनेर, जि.अहमदनगर यानी करून अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि : ३१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.विलास दत्तात्रय बारवकर
विद्याधाम सोसायटी, चाकण, ता.खेड, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, नगररचना पूर्व विभाग,
सहकारनगर, पुणे-९ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक, नगररचना आणि
मूल्यनिर्धारण विभाग, पुणे शाखा, २८३, नारायण पेठ, पुणे-३०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३९ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विलास दत्तात्रय बारवकर
विद्याधाम सोसायटी, चाकण, ता.खेड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक, नगररचना पूर्व विभाग,
सहकारनगर, पुणे श्रीमती साधना प्र.नाईक

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक, नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग,
पुणे शाखा, २८३, नारायण पेठ, पुणे श्री.प्रकाश बोंगाळे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

# विवेचन

बांधकामाला अकृषिक परवानगी कोणत्या निकषांवर देण्यात आली. याची माहिती १५० दिवसांनंतर मिळाली. आपल्या अर्जातील मागणी स्पष्ट होती तरीही ती संदिग्ध असल्याचे नमूद करून जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, पुणे शाखा, २८३, नारायण पेठ, पुणे यानी अभिलेख अवलोकनासाठी येण्याबाबत कळविले. हे उत्तर चुकीचे असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, नगररचना पूर्व विभाग, सहकारनगर, पुणे यानीही नमूद केले आहे. जाणीवपूर्वक असे उत्तर दिले असल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.विलास दत्तात्रय बारवकर यानी केली.

श्री.बारवकर यानी परवानगीच्या निकषांबाबत विचारणा केली असल्यामुळे माहितीबाबत संदिग्धता वाटली, म्हणून त्यांच्या दि.१७.८.२००९ रोजी प्राप्त झालेल्या अर्जाला दि.२५.८.२००९च्या पत्रान्वये उत्तर देऊन अभिलेख अवलोकनासाठी येण्याबाबत कळविले. त्यानुसार दि.११.९.२००९ रोजी कार्यालयात येऊन त्यानी सर्व कागदपत्रांचे निरीक्षण केले. परंतु कोणत्याही कागदपत्रांची मागणी न करता ते निघून गेले. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी ते उपस्थित नव्हते. तथापि नस्तीतील सर्व कागदपत्रे अपीलकर्त्यास विनामूल्य पुरविण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, नगररचना पूर्व विभाग, सहकारनगर, पुणे यानी दिले. त्यानुसार सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती विनामूल्य दिल्या. त्यानंतर आठ दिवसांनी त्यानी पुन्हा काही कागदपत्रांची मागणी केली. त्याही त्याच दिवशी विनामूल्य दिल्या. तशी त्यांची पोहोच दप्तरी आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, पुणे शाखा, २८३, नारायण पेठ, पुणे श्री.प्रकाश बोंगाळे यानी केले.

जन माहिती अधिकारी यानी विहित मुदतीत उत्तर दिले होते. परंतु माहितीची मागणी संदिग्ध असल्याचे उत्तर चुकीचे असल्याचे प्रथम अपिलाच्या निर्णयात नमूद केले आहे. तसेच अभिलेख अवलोकनानंतर कागदपत्रांची मागणी न करता अपीलकर्ता निघून गेले, याचीही नोंद केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्जांना दिल्या जाणाऱ्या उत्तराबाबत सर्व जन माहिती अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा झाली असून योग्य त्या सूचना देण्यात आल्या आहेत व प्रस्तुत प्रकरणी

दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही झालेली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक, नगररचना पूर्व विभाग, सहकारनगर, पुणे श्रीमती साधना प्र.नाईक यानी नमूद केले.

स्पष्टीकरणात्मक स्वरूपात निकषांची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील 'माहिती'च्या संज्ञेत येत नाही. तथापि अपीलकर्त्यास हव्या असलेल्या माहितीबाबत अधिक सकारात्मक पध्दतीने कार्यवाही करण्याची समज जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, पुणे शाखा, २८३, नारायण पेठ, पुणे श्री.प्रकाश बोंगाळे याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप रतनलाल ओसवाल
आनंद रत्न, बंगला नं.७, राजलक्ष्मी सोसायटी, स.नं.५८६/४/अ,
मार्केटयार्ड रोड, गुलटेकडी, पुणे-३७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, पुणे उपविभाग, पुणे,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, नागरी सुविधा केंद्र,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०६१ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.६.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप रतनलाल ओसवाल
आनंद रत्न, बंगला नं.७, राजलक्ष्मी सोसायटी, स.नं.५८६/४/अ,
मार्केटयार्ड रोड, गुलटेकडी, पुणे-३७

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार, नागरी सुविधा केंद्र,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.ज्ञानोबा परसराम गायकवाड

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

दारिद्र्यरेषेखाली असलेल्या पिवळी शिधापत्रिकाधारकांना रूपये २०,०००/-आत उत्पन्न नमूद केलेले असताना २१०००/-, २४०००/-, ३६०००/- अशा उत्पन्नाचे दाखले तलाठ्यांकडून / तहसीलदार कार्यालयाकडून दिले जात असल्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या जीवनदायी योजनेचा लाभ गरीब लोकांना मिळत नाही. त्याबाबतचे शासननिर्णय व परिपत्रकाची प्रत देण्यात आली असून त्यात विसंगती आहे. पुणे जिल्हा वगळता इतर ठिकाणी २०००० रूपये उत्पन्नाचा दाखला दिला जातो, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दिलीप रतनलाल ओसवाल यानी केली.

उत्पन्नाच्या दाखल्याबाबत विशिष्ट असे शासननिर्णय नाहीत. पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी काढलेल्या परिपत्रकाच्या आधारे दाखले दिले जातात. या परिपत्रकाची प्रत श्री.ओसवाल याना दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, नागरी सुविधा केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे श्री.ज्ञानोबा परसराम गायकवाड यानी केले.

गरीबांना जीवनदायी योजनेचा लाभ मिळण्याचा अपीलकर्त्यांनी उपस्थित केलेला मुद्दा महत्त्वाचा असला तरी तो माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.माणिक आनंदा चौगुले
मु.पो.जाखले, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, पन्हाळा, तहसील कार्यालय,
पन्हाळा, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी, मौजे जाखले,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७३० / २०१० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.४.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.माणिक आनंदा चौगुले
मु.पो.जाखले, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, पन्हाळा, तहसील कार्यालय, पन्हाळा,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.शरद वसंतराव पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा गाव कामगार तलाठी, मौजे जाखले,
ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.एच.के.कुंभार

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

फेरफाराच्या संदर्भातील नोटिशीच्या आपण मागितलेल्या प्रती व अन्य कागदपत्रे मिळाली नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.माणिक आनंदा चौगुले यानी केली.

याच माहितीच्या मागणीबाबतचे श्री.चौगुले यांचे अपील क्र.१९५/२००९ / कोल्हापूर यापूर्वी राज्य माहिती आयोगाने अमान्य केले आहे. त्यांच्या अर्जाला विहित मुदतीत उत्तर व माहिती देण्यात आली असून सहकार कायद्यानुसार संबंधित प्रकरणी नोटिसा देणे आवश्यक नसल्यामुळे त्याच्या प्रती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही हेही स्पष्ट केले आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पन्हाळा, तहसील कार्यालय, पन्हाळा, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर श्री.शरद वसंतराव पाटील यानी केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- २९ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.जयश्री समाधान वारे
मु.पो.कालगांव, ता.कराड, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (सामान्य प्रशासन विभाग ),
विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी
समिती क्र.१, पुणे विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५७७ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, पुणे विभाग, पुणे श्री.दिपक वडकुते | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जात पडताळणी करून मिळण्याची मागणी व त्याबाबतच्या अर्जावरील कार्यवाहीच्या माहितीची मागणी अपीलकर्त्या सौ.जयश्री समाधान वारे यानी केली होती. त्यांच्या दि.३.१२.२००९च्या अर्जाला दि.८.१२.२००९ रोजी उत्तर दिले. त्यांच्याकडून तपशील प्राप्त झाल्यानंतर तपासणी करता त्या निवडणुकीत निवडून आलेल्या नसल्यामुळे जात पडताळणी केली नसल्याचे स्पष्ट केले, असे जन माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, पुणे विभाग, पुणे श्री.दिपक वडकुते यानी नमूद केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.हनुमंत भानुदास गावडे
मु.पो.गोखळी, ता.फलटण, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण,
ता.फलटण, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती,
फलटण यांचे कार्यालय, ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५८७ / २००९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हनुमंत भानुदास गावडे
मु.पो.गोखळी, ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण,
ता.फलटण, जि.सातारा श्री.विजयसिंह लिंबाजी जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती,
फलटण यांचे कार्यालय, ता.फलटण, जि.सातारा श्री.नितीन मोहन दीक्षित

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## **विवेचन**

हरिजन वस्तीतील रस्ता व इतर कामांबाबत आपण मागितलेली माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.हनुमंत भानुदास गावडे यानी केली.

दोन अर्जांनुसार कामाच्या चौकशीची मागणी श्री.गावडे यानी केली होती. त्यावरील कार्यवाहीची माहिती त्यानी दि.३०.८.२००९ च्या अर्जान्वये मागितली होती. दि.३०.१०.२०१० रोजी संबंधित चौकशीचे अहवाल प्राप्त झाले व दि.१.११.२०१० रोजी यूपीसीने माहिती दिली. श्री.गावडे यानी प्रथम अपील केले नव्हते, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, फलटण यांचे कार्यालय, ता.फलटण, जि.सातारा श्री.नितीन मोहन दीक्षित व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.विजयसिंह लिंबाजी जाधव यानी पूरक कागदपत्रांसह केले. त्यानी केलेली कार्यवाही रास्त असून दिलेल्या माहितीची प्रत अपीलकर्त्यास पुन्हा द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि :- २९ जानेवारी २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक बबनराव नागवडे
मु.पो.खांबगांव बु., ता.दौंड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ,
पुणे विभाग, शंकरशेठ रस्ता, पुणे-३७ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय कर्मचारी व कल्याण अधिकारी,
राज्य परिवहन महामंडळ, पुणे विभाग, शंकरशेठ रस्ता, पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७४५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.१०.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अशोक बबनराव नागवडे
मु.पो.खांबगांव बु., ता.दौंड, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ,
पुणे विभाग, शंकरशेठ रस्ता, पुणे प्रतिनिधी श्री.व्ही.आर.चिंबळकर

**जन माहिती अधिकारी** तथा विभागीय कर्मचारी व कल्याण अधिकारी, राज्य परिवहन महामंडळ, पुणे विभाग, शंकरशेठ रस्ता, पुणे प्रतिनिधी श्री.व्ही.आर.चिंबळकर

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२६.१०.२०१० रोजी घेण्यात आली.

चालक-वाहकांच्या बदल्यांबाबत अवलंबिलेले धोरण चुकीचे असून बदल्या चुकीच्या पध्दतीने केल्या गेल्या आहेत. काही बदल्या जाणूनबुजून त्रास देण्याच्या हेतूने केल्या आहेत. तसेच काही कर्मचाऱ्यांना नियमबाह्यरित्या कायम केले आहे. त्यामुळे त्याबाबत दिलेली माहितीही चुकीची व दिशाभूल करणारी असून तीही विलंबाने दिली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अशोक बबनराव नागवडे यानी केली.

श्री.नागवडे यांच्या दि.८.७.२००८ च्या अर्जानुसार मागितलेली माहिती संबंधितांकडून प्राप्त करून घेऊन दि.११.८.२००८ च्या पत्रान्वये दिली. आणखी काही माहिती आवश्यक असल्यास देण्याची तयारीही दर्शविली, असे जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, पुणे विभाग, शंकरशेठ रस्ता, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.व्ही.आर.चिंबळकर यानी संदर्भित पत्राच्या जावक बारनिशीतील नोंदीच्या प्रतींसह नमूद केले.

बदल्यांबाबतच्या धोरणांविषयी श्री.नागवडे यानी भाष्य केले असून खुलासा, स्पष्टीकरण अशा स्वरूपाची विचारणा बहुसंख्य मुद्दयांमध्ये केली आहे. ती, तसेच बदल्यांविषयीचे त्यांचे आक्षेप या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.धनंजय अनिल मद्वाण्णा
सि.स.नं.३९५, केशवनाथ मंदिराच्या मागे,
सांभारे गणपती रोड, गांवभाग,
सांगली-४१६ ४१६

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी संचालक,**
वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय,
विश्रामबाग, सांगली-४१६ ४१५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय,
विश्रामबाग, सांगली-४१६ ४१५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११७/सांगली<br>११८/सांगली |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१.वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाने मागील वीस वर्षापासून विद्यार्थ्याकडुन आकारणी केलेली अनामत रक्कम, इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे शुल्क, महाविद्यालय विकास निधी व अन्य शुल्काचा तपशील<br>२. वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालयाची स्वायत्ता, प्रवेश, माजी विद्यार्थी संघटना, विद्यार्थी संघटना, तक्रार पुस्तक, परीक्षा फॉर्म इ.बद्दलची मागील वीस वर्षांची माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.धनंजय अनिल मद्वाण्णा यानी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१२.११.२००८ रोजीच्या सुनावणीला अपीलकर्ता श्री.मद्वाण्णा हे गैरहजर होते.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यानी मागणी केलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्याने सदरची माहिती अवलोकनास उपलब्ध करुन देण्याबाबतची जन माहिती अधिकारी, वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली यांची कृती योग्य आहे. तसेच वीस वर्षे एवढया दीर्घ कालावधीतील माहिती संकलित करण्यास वेळ लागला. अपीलकर्त्यास जसजशी माहिती संकलित झाली त्यानुसार विनामूल्य देण्यात आली, हे जन माहिती अधिकारी, वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली डॉ.श्रीरंग पांडुरंग चव्हाण व अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी संचालक, वालचंद अभियांत्रिकी महाविद्यालय, सांगली प्रा.अनिल आर.यार्दी यांचे निवेदन मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**पुणे.**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दिगंबर लिंगाप्पा पोळ
४४७, आंबा रोड, पेठ वडगांव, **अपीलकर्ता**
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
वडगांव नगरपरिषद कार्यालय, वडगांव **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा स्वच्छता निरीक्षक,
आरोग्य विभाग, वडगांव नगरपरिषद कार्यालय, वडगांव

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६२/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४/१/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता -** श्री. दिगंबर लिंगाप्पा पोळ<br>४४७, आंबा रोड, पेठ वडगांव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,<br>वडगांव नगरपरिषद कार्यालय, वडगांव श्री. विनायक आत्माराम वाठारे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा स्वच्छता निरीक्षक,<br>आरोग्य विभाग, वडगांव नगरपरिषद कार्यालय, वडगांव<br>श्री. उदयकुमार गोविंदराव डोंगरे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

# <u>विवेचन</u>

घंटागाडी घेण्यासाठी नगरपरिषदेने केलेला ठराव व प्रत्यक्ष कार्यवाही यात विसंगती आहे. निविदाप्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याचा संशय येतो. तसेच युनिक ऑटो केअर, मु. पो. वाठार ही संस्था सन २००७ पासून अस्तित्वात नसताना नोव्हेंबर २००९ पर्यंत वाहनांची दुरुस्ती, देखभाल आदिंची बिले या संस्थेच्या नावे देण्यात आली आहेत. दिलेली माहिती अपूर्ण व चुकीची आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. दिगंबर लिंगाप्पा पोळ यानी केली.

सन १९९९ पासून आपण वडगांव नगरपरिषद, वडगाव , जि. कोल्हापूर या गावीच सेवेत असून मूळ अर्जानुसार अभिलेखात उपलब्ध असलेली सर्व माहिती श्री. पोळ याना दिली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा स्वच्छता निरीक्षक, आरोग्य विभाग, वडगांव नगरपरिषद कार्यालय, वडगांव श्री. उदयकुमार गोविंदराव डोंगरे यानी केले.

सन २००९ पासून आपण मुख्याधिकारी पदी असून संबंधित संस्था अस्तित्वात होती, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, वडगांव नगरपरिषद कार्यालय, वडगांव श्री. विनायक आत्माराम वाठारे यानी केले. मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहिती श्री. पोळ यानी अपिलात मागितल्याचे त्यानी नमूद केले. २००७ पासून संस्था अस्तित्वात नसताना बिले त्या नावे दिल्याबाबतचे स्पष्टीकरण अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, वडगांव नगरपरिषद कार्यालय, वडगांव श्री. विनायक आत्माराम वाठारे देऊ शकले नाही.

निविदा प्रक्रिया आदिनुसार केलेली कार्यवाही कायदेशीर की बेकायदेशीर अशा स्वरुपाचे अपीलकर्त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे माहितीचा अधिकार अधिनियिम, २००५ च्या कक्षेतील नाहीत. तसेच मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहिती अपिलात मागणे योग्य नाही. तथापि अस्तित्वात नसलेल्या संस्थेच्या नावे बिले दिली गेल्याचा अपीलकर्त्यांचा आक्षेप सार्वजनिक निधीच्या विनियोगाच्या अनुषंगाने महत्वाचा असून त्याबाबतची वस्तुस्थिती स्पष्ट होणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. युनिक ऑटो केअर, मु. पो. वाठार, ही संस्था अस्तित्वात असण्याचा कालावधी व दिलेल्या बिलांचा कालावधी याबाबत तपासणी करुन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, वडगांव नगरपरिषद कार्यालय, वडगांव श्री. विनायक आत्माराम वाठारे यानी आयोगाला अहवाल सादर करावा, या आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, वडगांव नगरपरिषद कार्यालय, वडगांव श्री. विनायक आत्माराम वाठारे यानी दि. १५.२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सूरजमल बुधमल लोढा
प्लॉट नं. २६, मयूर कॉलनी, — अपीलकर्ता
कोथरुड, पुणे ४११ ०२९

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,
झोन क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,
झोन क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४५५/२००९/पूणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/१/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सूरजमल बुधमल लोढा
प्लॉट नं. २६, मयूर कॉलनी, कोथरुड, पुणे ४११ ०२९

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उप अभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,
झोन क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. साहेबराव दांडगे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,<br>बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग,<br>झोन क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. रामकृष्ण वारे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सहकारी गृहरचना संस्थेच्या संदर्भात मंजूर ले-आऊट बाबतची माहिती आपण मागितली होती. झोनमध्ये बदल झालेल्या भाग नकाशाची प्रत मिळाली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. सूरजमल बुधमल लोढा यांचे प्रतिनिधी ॲड. के.एम.जाधव यानी केले.

संबंधित नकाशा सन १९७० मधील असून उपलब्ध होत नाही. त्याबाबत शासनाशी पत्रव्यवहार केला आहे व प्रत उपलब्ध झाल्यास देण्यात येईल, असे श्री. सूरजमल बुधमल लोढा याना कळविले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग, झोन क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. रामकृष्ण वारे यानी केले. मूळ प्रकरणावरुन माहिती संकलित करुन देता येणार नाही. उपलब्ध असलेल्या स्वरुपात देता येईल. तसा निर्णय आपण दिल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा नगर उप अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग, झ ाोन क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. साहेबराव दांडगे यानी नमूद केले.

अपिलीय प्राधिकारी तथा नगर उप अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग, झ ाोन क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. साहेबराव दांडगे यानी दिलेला निर्णय योग्य आहे. तथापि अपीलकर्त्यास हव्या असलेल्या भाग नकाशाची प्रत-आवश्यक तर प्रत्यक्ष प्रतिनिधी पाठवून-शासनाकडून प्राप्त करुन घ्यावी व अपीलकर्त्यास पुरवावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्या बाबतचा अनुपालन अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती

अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना विभाग, झोन क्र.१, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. रामकृष्ण वारे यानी  १०.२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**३१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.निमराज पंढरीनाथ विसपुते
आर/१५, बी, स्वामी समर्थ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित(अ),
पाषाण, पुणे-२१ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग,
ढोले पाटील रोड, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रवर्तक, पाठराखीण भगिनी सहाय्य समिती,
६०१, शिवाजीनगर, पुणे-४

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३०३७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा प्रवर्तक, पाठराखीण भगिनी सहाय्य समिती,
६०१, शिवाजीनगर, पुणे प्रतिनिधी सौ.आसावरी अत्रे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.७.१.२०११ रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.निमराज पंढरीनाथ विसपुते यानी माहितीची मागणी केली असली तरी आपल्या संस्थेला कोणतेही सरकारी अनुदान वा अर्थसहाय्य मिळत नाही त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मधील तरतुदीनुसार संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरत नाही. असे प्रतिपादन पाठराखीण भगिनी सहाय्य समिती, शिवाजीनगर, पुणे या संस्थेचे प्रवर्तक यांच्या प्रतिनिधी सौ.आसावरी अत्रे यानी लेखी व तोंडी केले. ते रास्त आहे. सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. प्रभाकर दत्तात्रय टिळेकर
मु. पो. सासवड, नेताजी चौक, म्हेत्रे आळी, अपीलकर्ता
ता. पुरंदर, जि. पुणे

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रण,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
सासवड आगार, जि. पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा आगार व्यवस्थापक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
सासवड आगार, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४५९/२००९/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. प्रभाकर दत्तात्रय टिळेकर
मु. पो. सासवड, नेताजी चौक, म्हेत्रे आळी, ता. पुरंदर, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रण,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
सासवड आगार, जि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री. ए. जी. जाधव

**विद्यमान जन माहिती अधिकारी** तथा आगार व्यवस्थापक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
सासवड आगार, जि. पुणे श्री. व्ही. वाय. रावळ

| | |
|---|---|
| | **तक्कालीन जन माहिती अधिकारी** श्री. आर.डी.मोरे |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

दोन कर्मचा-यांच्या विवाहासाठी दोन एस.टी. बसेस गेल्याच्या संदर्भात मागितलेली माहिती चुकीची दिली. खरी माहिती लपवून ठेवली. नोंदी नसलेल्या कागदपत्रांच्या प्रती दिल्या, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. प्रभाकर दत्तात्रय टिळेकर यानी केली.

अपीलकर्ता म्हणतात त्याप्रमाणे एस.टी.बसेस गेलेल्या नव्हत्या. गाडया डेपो बाहेर जाताना नोंदी केल्या जातात. या नोंदींची प्रत अपीलकर्त्यास दिली. मूळ कागदपत्रे ते पाहू शकतात, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सासवड आगार, जि. पुणे श्री. व्ही. वाय. रावळ यानी केले.

संबंधित नोंदीच्या प्रती व गाडया पाठविल्या गेल्या नसल्याचे लेखी स्वरुपात अपीलकर्त्यास दोन दिवसांत द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. राजू बाळासाो गोरे
मु. पो. हातकणंगले, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी,
कोल्हापूर विभाग यांचे कार्यालय, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी,
कोल्हापूर विभाग यांचे कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४२३/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४/१/२०११ |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर विभाग यांचे कार्यालय, कोल्हापूर डॉ. डी. टी. पवार<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर विभाग यांचे कार्यालय, कोल्हापूर श्री. राजेंद्र मदने | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी यानी ५२ दिवसांनी शुल्क कळविले व जी माहिती नाकारली ती कोणत्या नियमानुसार देता येत नाही, हे नमूद केले नाही. माहिती उशिरा मिळाल्यामुळे जन माहिती अधिका-यांवर

दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. राजू बाळासाो गोरे यानी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री. गोरे यानी विशिष्ट नमुन्यात विस्तृत स्वरुपाची माहिती दि.३.१०.२००९ च्या अर्जान्वये मागितली होती. दि. २२.१०.२००९ च्या पत्रान्वये मुद्देनिहाय उत्तर देऊन अभिलेख अवलोकन करण्यास त्याना कळविले होते. ते आले नाहीत, म्हणून त्यांच्या पत्रानुसार शुल्क कळविले. ३० दिवसात माहिती दिली नसल्यामुळे ती निःशुल्क मिळावी, अशी मागणी त्यानी केली. त्यानुसार रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली. ते टपाल परत आले. त्यानंतर पुन्हा माहिती पाठविली, असे जन माहिती अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर विभाग यांचे कार्यालय, कोल्हापूर श्री. राजेंद्र मदने यानी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

बदलीच्या संदर्भात स्पष्टीकरणाच्या स्वरुपाची मागणी श्री. गोरे यानी केली होती. परंतु ही प्रशासकीय कार्यवाहीची बाब असून कारणे/खुलासा अशा स्वरुपाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत 'माहिती'च्या संज्ञेत येत नाही. अपिलाच्या निर्णयात तसे स्पष्ट केले, असे अपिलीय प्राधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर विभाग यांचे कार्यालय, कोल्हापूर डॉ. डी. टी. पवार यानी नमूद केले. त्यानी दिलेला निर्णय योग्य आहे.

जन माहिती अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, कोल्हापूर विभाग यांचे कार्यालय, कोल्हापूर श्री. राजेंद्र मदने यानी विहित मुदतीत कार्यवाही केली आहे. मात्र मूळ उत्तरातच शुल्क कळविले जाणे आवश्यक असल्याची समज त्याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**३१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुनिल बापूसाो आंबी
मु. पो. उदगांव ( साखळे मळा), अपीलकर्ता
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर-४१६ १३४

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
घोले रोड, पुणे- ५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक (अतां),
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
घोले रोड, पुणे- ५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५८५/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४/१/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. सुनिल बापूसाो आंबी
मु. पो. उदगांव ( साखळे मळा), ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
घोले रोड, पुणे श्री. बाळासाहेब गंगाराम भालेराव

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक (अतां),
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
घोले रोड, पुणे श्री. विनोद खंडेराव अहिरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

पदाच्या आकृतीबंध आढाव्यानुसार अतिरिक्त कर्मचा-यांचे समायोजन करण्याबाबत योग्य पध्दतीने कार्यवाही झालेली नाही व त्याबाबतची माहिती चुकीची देण्यात येत आहे. आपल्यावरील अन्यायाचाही त्यात समावेश आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. सुनिल बापूसाो आंबी यानी केले.

श्री. आंबी यानी अनेक मुद्दयांचे स्पष्टीकरण, कार्यवाहीविषयक आक्षेपांबाबतचा खुलासा अशा स्वरुपाची विचारणा केली होती. विहित मुदतीत त्याना उत्तर दिले. विना अनुदानित संस्थांची माहिती आपल्याकडे नसते. ऊर्वरित सर्व माहिती दिली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक (अतां), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, घोले रोड, पुणे श्री. विनोद खंडेराव अहिरे यानी पूरक कागदपत्रांसह केले. अतिरिक्त कर्मचा-यांचे समायोजन कशा पध्दतीने करावे याबाबत माहिती दिल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, घोले रोड, पुणे श्री. बाळासाहेब गंगाराम भालेराव यानी नमूद केले.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक (अतां), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, घोले रोड, पुणे श्री. विनोद खंडेराव अहिरे व अपिलीय प्राधिकारी तथा सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, घोले रोड, पुणे श्री. बाळासाहेब गंगाराम भालेराव यांनी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे. खुलासा, स्पष्टीकरण अशा स्वरुपाची विचारणा व अपीलकर्त्यांच्या अन्य तक्रारी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. दिलीप अशोक देसाई
ए-२२ सरगम विहार अपार्टमेंट — अपीलकर्ता
जिल्हा परिषद ऑफिस समोर, नागाळा पार्क, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा न्यायाधीश क्र. १,
जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५७ + ३५८/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४/१/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. दिलीप अशोक देसाई
ए-२२ सरगम विहार अपार्टमेंट, जिल्हा परिषद ऑफिस समोर,
नागाळा पार्क, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा न्यायाधीश क्र. १,
जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी श्री.डी.एस.कुलकर्णी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

एका खटल्यातील रोजनाम्याची व कोल्हापूरच्या जिल्हा व सत्र न्यायालयातील कर्मचा-यांविषयीची माहिती आपण मागितली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत तरतुदींनुसार ती न देता वेगळयाच कायद्यान्वये उत्तर दिले व अपिलाचा निर्णय केला, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. दिलीप अशोक देसाई यानी केली.

मुंबई उच्च न्यायालयाने माहितीच्या अधिकारातील माहितीबाबत केलेल्या नियमावलीनुसार पूर्तता करण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले. त्यानी तशी पूर्तता केली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर श्रीमती पी. डी. देसाई व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा न्यायाधीश क्र. १, जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर श्री. व्ही. डी. गुणे यांचे लेखी निवेदन पूरक कागदपत्रांसह जन माहिती अधिकारी यानी सादर केले. त्यानी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास उच्च न्यायालयाच्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ विषयक नियमावलीनुसार आवश्यक ती पूर्तता करुन माहिती प्राप्त करुन घेता येईल.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. राजाराम शंकरराव धारवट
व्दारा जयंती सायझर्स १८/२०८, स्टेशन रोड, अपीलकर्ता
आवळे पेट्रोलपंपाच्या मागे, इचलकरंजी, जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१२
जुना राजवाडा, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३५६/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ४/१/२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. राजाराम शंकरराव धारवट
व्दारा जयंती सायझर्स १८/२०८, स्टेशन रोड,
आवळे पेट्रोलपंपाच्या मागे, इचलकरंजी, जि. कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१२
जुना राजवाडा, कोल्हापूर श्री.व्ही. पी. पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

भूमि संपादन भरपाईची रक्कम न्यायालयाच्या निर्णयानुसार मिळावी अशी आपली मागणी असून त्यासाठी अर्ज केला आहे. काही मिळकत धारकांना अशी रक्कम मिळाली असून काहींना मिळालेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. राजाराम शंकरराव धारवट यानी केली.

अभिलेखात उपलब्ध असल्यानुसार सर्व माहिती दिली. न्यायालयाच्या निर्णयाची सत्यप्रत अपीलकर्ता मागत असून ती न्यायालयातून घेण्याबाबत कळविले, असे जन माहिती अधिकारी तथा विशेष भूमि संपादन अधिकारी क्र.१२, जुना राजवाडा, कोल्हापूर श्री.व्ही. पी. पाटील यानी नमूद केले.

भरपाई रकमेबाबत न्यायालयात गेल्यास रक्कम वाढविल्यावर जिल्हाधिकारी यानी सुनावणी घेऊन निर्णय जाहीर करावा, अशी नियमावलीत तरतुद आहे. श्री. धारवट यांच्या अर्जाबाबत यानुसार सर्व पूर्तता झालेली नाही. तथापि हा प्रशासकीय कार्यवाहीचा भाग आहे. या संदर्भात संपूर्ण संचिका त्याना दाखवून आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या प्रती देण्यात येतील, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर श्री. तुकाराम कासार यानी केले.

अपीलकर्त्यांची भरपाईची मागणी हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील विषय नाही. त्याना आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करुन हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करुन घेता येतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**

**पुणे** **राज्य माहिती आयुक्त,**

**दि :- ३१ जानेवारी २०११** **पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. अंबादास बालाजी पोगूल
१४९, तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सोलापूर विभाग, नाथ प्राईड, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष/सचिव,
श्री कुरुहिनशेट्टी शिक्षण संस्था,
१९१, साखर पेठ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ७४२/२००९/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९/१०/२०१० |
| **३.** | **उपस्थित**<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष/सचिव,<br>श्री कुरुहिनशेट्टी शिक्षण संस्था, १९१, साखर पेठ,<br>जि. सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. नागनाथ सिद्राम दंडगळ | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. अंबादास बालाजी पोगूल यानी श्री कुरुहिनशेट्टी शिक्षण संस्थेची माहिती मागितली असून सन १९८५ मध्ये संस्था नोंदणीकृत होती. तथापि गेल्या वीस वर्षांपासून ती बंद आहे. तसेच संपूर्ण दप्तर तत्कालीन विश्वस्त व अध्यक्षांच्या ताब्यात होते. त्यामुळे त्याविषयी आपण कोणतेही भाष्य करु शकत नाही, असे संस्थेचे सदस्य श्री. शंकरराव लिंगप्पा बंदगी ( वय ७८ वर्षे) यांचे लेखी निवेदन त्यांचे प्रतिनिधी श्री. नागनाथ सिद्राम दंडगळ यानी सादर केले. संदर्भित शिक्षण संस्था विश्वस्त संस्था असून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्र. ५१३२/२००८ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मधील तरतुदीनुसार ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते याचे पुरावे अपीलकर्त्यांनी दिलेले नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुरेश भाऊ लोकरे
मु. मोरवंची, पो. शिरापुर (सो.), अपीलकर्ता
ता. मोहोळ, जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
ता. मोहोळ, जि. सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
ता. मोहोळ, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११७२/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
ता. मोहोळ, जि. सोलापूर श्री. पी. एन. दीक्षित

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सुरेश भाऊ लोकरे यानी मोहोळ तालुक्यातील खातेवाटप-वारसनोंदविषयक माहिती दि.२.३.२०१० च्या अर्जान्वये मागितली होती. विस्तृत माहिती असल्यामुळे कागदपत्रांचे अवलोकन करुन आवश्यक असलेल्या प्रती घ्याव्यात, असे श्री. लोकरे याना दि.२९.३.२०१० च्या पत्रान्वये कळविले. हे पत्र समक्ष देऊ केले असता त्यानी स्वीकारले नाही म्हणून गाव कामगार तलाठी यानी तसा पंचनामा करुन त्यांच्या घरावर डकविले. प्रथम अपिलाच्या सुनावणीला ते उपस्थित नव्हते. माहिती तयार असून योग्य ते शुल्क भरल्यास देता येईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, ता. मोहोळ, जि. सोलापूर श्री. पी. एन. दीक्षित यानी उपरोक्त पंचनाम्याच्या प्रतींसह केले. त्यानी केलेली कार्यवाही लक्षात घेता अपीलकर्त्याची कृती योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

१. श्री. अजित/पप्पू भारत फरतडे
२. श्री. राजेंद्र सुभदार लोंढे
३. श्री. सौदागर श्रीधर मुकटे
४. श्री. ज्ञानेश्वर तुकाराम फरतडे — अपीलकर्ता
५. श्री. राजेंद्र चांगदेव फरतडे
व्दारा सौदागर मंकटे मु.साताली, पो.उपळवाटे,
ता. करमाळा, जि. सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलिस अधीक्षक,
गुन्हे अन्वेषण विभाग, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अपर पोलिस अधीक्षक,
गुन्हे अन्वेषण विभाग, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३६९+१३७०+१३७१+१३७२+१३७३/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/१०/२०१० |
| **३.** | **उपस्थित** **जन माहिती अधिकारी** तथा अपर पोलिस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, कोल्हापूर श्री. मच्छिंद्र रामचंद्र थिटे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जळीत/खून प्रकरणी पोलिसांकडे आपण दिलेल्या जबाबाच्या प्रती अपीलकर्ता १) श्री.अजित/पप्पू भारत फरतडे २) श्री. राजेंद्र सुभदार लोंढे ३) श्री. सौदागर श्रीधर मुकटे ४) श्री. ज्ञानेश्वर तुकाराम फरतडे ५) श्री. राजेंद्र चांगदेव फरतडे यांनी मागितल्या होत्या. त्यातील दोन आरोपी असून दोघे आरोपीच्या बाजूचे साक्षीदार आहेत. आपण दिल्यानुसारच जबाब नोंदविला आहे की नाही याची पडताळणी करण्यासाठी ही प्रत हवी असल्याचे त्यानी अर्जात नमूद केले होते. त्यामुळे कार्यालयात येऊन जबाबाचे अवलोकन करण्याबाबत त्यांना कळविले होते. अपिलीय प्राधिका-यांनीही ते ग्राहय ठरविले. गुन्हयाच्या तपासानंतर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे तसे कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अपर पोलिस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, कोल्हापूर श्री. मच्छिंद्र रामचंद्र थिटे यानी केले.

अपीलकर्त्यांच्या मागणीनुसार जबाब पडताळणी करीता अवलोकनासाठी उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी तथा अपर पोलिस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, कोल्हापूर श्री. मच्छिंद्र रामचंद्र थिटे यानी कळविले. त्यानी माहिती नाकारलेली नाही. तथापि तपास पूर्ण झाला आहे व संबंधित जबाबाच्या प्रती देण्यास न्यायालयाने मनाई केलेली नाही. हे लक्षात घेता जबाबाच्या प्रती अपीलकर्त्यांना देणे आवश्यक आहे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार ५ अपीलकर्ते व ३ ऊर्वरित अर्जदार या सर्वांना जबाबाच्या प्रमाणित प्रती दि. ३.११.२०१० च्या पत्रान्वये रजिस्टर्ड टपालाने पाठविण्यात आल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा अपर पोलिस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, कोल्हापूर श्री. मच्छिंद्र रामचंद्र थिटे यानी दि. ४.११.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**पुणे खंडपीठ**

**पुणे**

**दि :- ३१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.खंडेराव मारूती वाघमोडे
१२९, बुधवार पेठ, मिलिंदनगर, सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाथ प्राईड, पहिला मजला,
सिव्हील हॉस्पिटलच्या पूर्वेस, उत्तर सदर बझार, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय,
नाथ प्राईड, पहिला मजला, सिव्हील हॉस्पिटलच्या पूर्वेस, उत्तर सदर बझार, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९७६ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१४.७.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नाथ प्राईड, पहिला मजला, सिव्हील हॉस्पिटलच्या पूर्वेस, उत्तर सदर बझार, सोलापूर प्रतिनिधी श्री.एम.डी.शेख

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, नाथ प्राईड, पहिला मजला, सिव्हील हॉस्पिटलच्या पूर्वेस, उत्तर सदर बझार, सोलापूर श्री.एम.डी.शेख

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता उपस्थित न राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१४.७.२०१० रोजी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.खंडेराव मारूती वाघमोडे यानी अपील क्र. २१४ व ४०५ मध्ये मागितलेली माहिती प्रस्तुत अपिलातही मागितली असून मूळ माहिती देण्यास विलंब झाल्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, नाथ प्राईड, पहिला मजला, सिव्हील हॉस्पिटलच्या पूर्वेस, उत्तर सदर बझार, सोलापूर श्री.का.भा.धावारे याना रु.२५,००० शास्ती लावण्यात आली आहे. माहिती देण्यास विलंब झाल्याची तीच तक्रार याही अपीलात आहे. असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालय, नाथ प्राईड, पहिला मजला, सिव्हील हॉस्पिटलच्या पूर्वेस, उत्तर सदर बझार, सोलापूर श्री.एम.डी.शेख यानी केले. ते लक्षात घेता एकाच विषयातील नियमभंगाबद्दल पुन्हा शास्ती लावणे न्यायोचित नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.अल्लाबक्ष अ.रहिमान काझी
नूर बिल्डिंग, मालगाव रोड,
खोतनगर, मिरज, जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५९४/सांगली |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** जोडपत्र-अ ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.अल्लाबक्ष अ.रहिमान काझी यानी दि.१०.१२.२००७ रोजीच्या एकाच माहिती-मागणी अर्जाच्या अनुषंगाने आयोगाकडे दोन स्वतंत्र अपिले केली आहेत. दि.२२.६.२००९ रोजीच्या सुनावणीला ते गैरहजर होते. याच विषयाबाबतच्या त्यांच्या अन्य अपिलावर (अपील क्र.५६७/सांगली) आयोगाने दि.२०.१०.२००९ रोजी सुनावणी घेऊन दि.३१.३.२०१० रोजी ओदश पारित केलेले आहेत. तेच ओदश प्रस्तुत अपिलातदेखील लागू होतात. तसेच अशा रीतीने

एकाच माहिती-मागणी अर्जासाठी आयोगाकडे दोन वेगवेगळी अपिले करण्याची श्री.काझी यांची कृती योग्य नसल्याची समज त्याना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री. हिजबखान अजीमोद्दीन पठाण
प्लॉट नं. ३२, घर नं. २४०, केशवनगर — अपीलकर्ता
दक्षिण सदर बझार, अलंकार हॉटेल जवळ, सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता,
श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,
सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी वैद्यकीय अधिकारी,
श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२१३/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८/१०/२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. हिजबखान अजीमोद्दीन पठाण
प्लॉट नं. ३२, घर नं. २४०, केशवनगर
दक्षिण सदर बझार, अलंकार हॉटेल जवळ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधिष्ठाता,
श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,
सोलापूर यांचे प्रतिनिधी डॉ. सी. व्ही. भालेकर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी वैद्यकीय अधिकारी,
श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,

| | |
|---|---|
| सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. एस. व्ही. कांबळे | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

डोळे तपासणीनंतर अंधत्वाच्या प्रमाणाबाबतचा दाखला चुकीचा दिला. त्याबाबतचे नियमावली व स्पष्टीकरण दिले नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. हिजबखान अजीमोद्दीन पठाण यानी केली.

श्री. पठाण याची अंधत्वाच्या विशिष्ट टक्केवारीच्या दाखल्याची मागणी असून ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेतील नाही. माहिती मुदतीत देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी वैद्यकीय अधिकारी, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांचे प्रतिनिधी श्री. एस. व्ही. कांबळे यानी श्री पठाण यांच्या माहितीची पोहच असलेल्या पत्राच्या प्रतीसह केले. जन माहिती अधिका-यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. अपीलकर्त्यांची तक्रार हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

सौ.अंजना गोविंद तनपुरे
मु.पो.धांगवडी, ता.भोर, जि.पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, भोर, ता.भोर, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत धांगवडी,
ता.भोर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २१२६ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, भोर, ता.भोर, जि.पुणे श्री.सुनिल लक्ष्मण शेटे

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत धांगवडी,
ता.भोर, जि.पुणे श्री.सुहास जगन्नाथ मोरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्त्या सौ.अंजना गोविंद तनपुरे यानी पंचायत समिती, भोर यांच्याकडे माहिती मागणीसाठी केलेला अर्ज दि.४.३.२०१० रोजी ग्रामपंचायतीला प्राप्त झाला. सन १९८२ ते २०१० या कालावधीतील विविध स्वरुपाची माहिती त्यानी मागितली होती. दि. १९.३.२०१०च्या पत्रान्वये त्याना शुल्क कळविले. ते त्यानी भरले नाही. तसेच कोणताही पत्रव्यवहारही केला नाही. प्रथम अपिलाच्या सुनावणीला त्यांचे पती प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. तेव्हाही माहिती देण्याची तयारी दर्शविली होती, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत धांगवडी, ता.भोर, जि.पुणे श्री.सुहास जगन्नाथ मोरे अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, भोर, ता.भोर, जि.पुणे श्री.सुनिल लक्ष्मण शेटे यानी पूरक कागदपत्रांसह केले. त्यांनी केलेली कार्यवाही रास्त आहे. सबब आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे :

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.शुक्राचार्य बापूराव गायकवाड
बी ट्ट, प्लेझंट पार्क नं.२, को-ऑप.हौसिंग सोसायटी,
भैरोबा नाला, वानवडी, पुणे-१३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर उपअभियंता (विकास योजना क्र.४),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, पुणे महानगरपालिका,
बांधकाम नियंत्रण व बांधकाम परवाना, शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६७७ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शुक्राचार्य बापूराव गायकवाड
बी १/४, प्लेझंट पार्क नं.२, को-ऑप.हौसिंग सोसायटी,
भैरोबा नाला, वानवडी, पुणे-१३

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता, पुणे महानगरपालिका, बांधकाम नियंत्रण व बांधकाम परवाना, शिवाजीनगर, पुणे श्री.नरेंद्र कुलकर्णी

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

मूळ नकाशात दर्शविल्यापेक्षा वेगळे बांधकाम केल्याच्या संदर्भातील मंजूरीचे नियम व अनुषंगिक कागदपत्र आदिंची माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, पुणे महानगरपालिका, बांधकाम नियंत्रण व बांधकाम परवाना, शिवाजीनगर, पुणे यांच्याकडे मागितली होती, ती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शुक्राचार्य बापूराव गायकवाड यानी केली.

अपीलकर्ता यानी मागणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रती संचिकेचे अवलोकन करून पूर्वीच घेतल्या होत्या. सन १९८७ व १९९२ मध्ये सुधारित नकाशे तयार करण्यात आले होते. नकाशा व अनुषंगिक नियमावलीची प्रत दिली. बांधकाम बदलाबाबतचे स्पष्टीकरणही दिले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, पुणे महानगरपालिका, बांधकाम नियंत्रण व बांधकाम परवाना, शिवाजीनगर, पुणे श्री.नरेंद्र कुलकर्णी यानी पूरक कागदपत्रांसह केले. माहितीबाबतची कार्यवाही योग्य असून अपीलकर्त्याचे प्रशासकीय कार्यवाहीबाबतचे आक्षेप हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयाचा विषय नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.श्रावण हरीबा भंडारे
मु.बोगाव,पो.कारंबा, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, उत्तर सोलापूर, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत बाणेगांव,
ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४१५ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१०.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, उत्तर सोलापूर, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.एस.एस.खरबस

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत बाणेगांव, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर
विद्यमान ग्रामसेवक-श्री.रामचंद्र शिवा कांबळे, तत्कालीन-श्री.नंदकुमार प्रताप पाटील

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.श्रावण हरिबा भंडारे यानी माहिती व्यक्तिशः नेणार असल्याचे अर्जात म्हटले होते. माहिती तयार असल्याचे समक्ष सांगूनही ते घेण्यासाठी आले नाहीत. माहिती तयार आहे, असे प्रतिपादन विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत बाणेगांव, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर अनुक्रमे श्री.रामचंद्र शिवा कांबळे व श्री.नंदकुमार प्रताप पाटील यानी केले. अतिक्रमणाबाबत अपीलकर्त्यांना नोटीस दिल्यानंतर माहिती-मागणीचा अर्ज त्यानी पंचायत समितीकडे केला होता, असे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उत्तर सोलापूर, जि.सोलापूर प्रतिनिधी श्री.एस.एस.खरबस यानी सांगितले.

अपीलकर्त्यास माहिती निःशुल्क पाठवावी असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत बाणेगांव, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर यानी दि.११.११.२०१० रोजी माहिती पाठविल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, उत्तर सोलापूर, जि.सोलापूर यानी दि.१९.११.२०१० च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मारुती ज्ञानदेव पाडुळे
अजिंक्य निवास, कृष्णाजीनगर, मु.पो.ता.करमाळा, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, कुर्डुवाडी,
ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६८३/ २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१०.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मारुती ज्ञानदेव पाडुळे
अजिंक्य निवास, कृष्णाजीनगर, मु.पो.ता.करमाळा, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.एन.के.काळे

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.एस.जे.गणदास | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## <u>विवेचन</u>

पदोन्नतीच्या अनुषंगाने व आपल्यावर झालेल्या अन्यायाबाबत सहा स्मरणपत्रे आपण पाठविली होती. त्यावरील कार्यवाहीबाबतची माहिती विहित मुदतीत व योग्य अशी दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मारूती ज्ञानदेव पाडुळे यानी केली.

श्री.पाडुळे यानी सन १९९९ मधील व विस्तृत स्वरूपाची माहिती मागितली होती. त्यावेळी त्याना कार्यमुक्त करण्यात आले होते व त्या अनुषंगाने अनेक मुद्दयांचा खुलासा विचारणारी व काही मुद्दयांमध्ये संदिग्ध स्वरूपाची मागणी त्यानी केली होती. त्यांचा अर्ज संबंधित विभागांकडे वर्ग केला. माहिती विस्तृत असल्यामुळे अतिरिक्त मुदत मागून अपीलकर्त्याच्या संमतीने त्यानुसार माहिती देण्याचे प्रथम अपिलाच्या सुनावणीदरम्यान ठरले. त्यानुसार रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली. पूर्ण माहिती मिळाली नसल्याची तक्रार त्यानी केल्यानंतर त्याना खुलाशासाठी समक्ष भेटण्याबाबत कळविले. ते आले नाहीत. त्यांच्या मूळ प्रकरणी चौकशी करून कार्यकारी अभियंता याना अहवाल पाठविला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.एस.जे.गणदास यानी केले.

संबंधित लिपिकांना अपघात झाल्यामुळे मूळ उत्तराला विलंब झाला. श्री.पाडुळे हे शाखा अभियंता असून त्यांच्यावर दोषारोपपत्र दाखल केले असल्यामुळे, अशा प्रकारचे अर्ज ते करीत असतात, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर श्री.एन.के.काळे यानी केले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यांनी स्पष्टीकरण, खुलासे, भाष्य अशा स्वरूपाची केलेली मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत

माहितीच्या संज्ञेत येत नाही. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापूर यानी माहितीबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.मनोहर शंकर कांबळे
द्वारा-राहुल दत्तात्रय कांबळे
स.क्र.१४/१५ बी-१/३, चव्हाणनगर, धनकवडी, पुणे-४३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-१ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी क्र.१,
तहसील कार्यालय आवार, शुक्रवार पेठ, पुणे-२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९४४ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१२.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.मनोहर शंकर कांबळे
द्वारा-राहुल दत्तात्रय कांबळे
स.क्र.१४/१५ बी-१/३, चव्हाणनगर, धनकवडी, पुणे-४३

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे प्रतिनिधी श्री.संग्राम सुं.जोगदंड

| | |
|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी क्र.१,<br>तहसील कार्यालय आवार, शुक्रवार पेठ, पुणे श्री.सु.सो.इंदलकर | |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

दि.१७.५.१९८५ च्या कोर्ट वाटप प्रकरणातील मोजणी नकाशाची प्रत व अन्य कागदपत्रांची मागणी आपण केली होती. ती अभिलेखात उपलब्ध होत नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. मागणीनुसार नकला पुरविण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यानी देऊनही माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.मनोहर शंकर कांबळे यानी केली.

संबंधित माहिती अभिलेखात उपलब्ध नाही व रजिस्टरमध्येही त्याची नोंद नाही अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, पुणे, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे यांच्या आदेशानंतर कागदपत्रांचा शोध घेण्यासाठी चार कर्मचाऱ्यांची नेमणूक करून कसून शोध घेऊनही कागदपत्रे उपलब्ध झाली नाहीत, तसे अपीलकर्त्यास कळविले, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.१, तहसील कार्यालय आवार, शुक्रवार पेठ, पुणे श्री.सु.सो.इंदलकर यानी केले. संबंधित प्रकरण तहसीलदार कार्यालयाकडे पाठविले असल्यास तेथे शोध घ्यावा लागेल, असेही त्यानी नमूद केले. त्यानुसार तहसीलदार, पुणे शहर यानी शोध घेऊन अपीलकर्त्यास कळवावे, असे आयोगाचे आदेश जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.१, तहसील कार्यालय आवार, शुक्रवार पेठ, पुणे यानी तहसीलदार, पुणे शहर याना अवगत करावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.३१.१२.२०१०च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यानी तहसीलदार, पुणे शहर व उपअधीक्षक भूमी अभिलेख, हवेली, जि.पुणे याना कळविल्याचे जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.१, तहसील कार्यालय आवार, शुक्रवार पेठ, पुणे श्री.सु.सो.इंदलकर यानी आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्त्यांनी मागणी केलेल्या कागदपत्रांचा शोध घेऊन कळविण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तहसीलदार, पुणे शहर व उपअधीक्षक, भूमी अभिलेख, हवेली, जि.पुणे यानी दि.१५.२.२०११ पर्यंत आयोगाला सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास पुरवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

प्रतः: (१)तहसीलदार, पुणे शहर, शुक्रवार पेठ, पुणे

(२) उपअधीक्षक, भूमी अभिलेख, हवेली, जि.पुणे, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे यांना पुढील योग्य त्या कारवाईसाठी.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.नारायण भिवा कांबळे
मु.पो.शिरगाव, ता.कराड, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी, कृषी विभाग, कराड,
उत्तर तालुका, जि.सातारा उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मंडल कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालय, कृषी विभाग, कराड, उत्तर तालुका, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४७ / २०१० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.११.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नारायण भिवा कांबळे
मु.पो.शिरगाव, ता.कराड, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा तालुका कृषी अधिकारी, कृषी विभाग, कराड, उत्तर तालुका, जि.सातारा श्री.सुभाष माणिकराव घाडगे

**जन माहिती अधिकारी** तथा मंडल कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालय, कृषी विभाग, कराड, उत्तर तालुका, जि.सातारा श्री.अरूण सोपानराव तावरे

| | |
|---|---|
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

शेतकऱ्यांना दिलेले अनुदान व सवलत याबाबतची माहिती विशिष्ट नमुन्यात आपण मागितली होती. परंतु जन माहिती अधिकारी तथा मंडल कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालय, कृषी विभाग, कराड, उत्तर तालुका, जि.सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, कृषी विभाग, कराड, उत्तर तालुका, जि.सातारा यांच्या पातळीवरून कोणतीही माहिती मिळाली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.नारायण भिवा कांबळे यानी केली.

श्री.कांबळे यांच्या दि.१५.१०.२००९ च्या अर्जाला दि.३०.१०.२००९ रोजी उत्तर देऊन शुल्क कळविले. त्यानी शुल्क भरले नाही, तरीही माहिती तयार असून त्यांच्या मागणीनुसार व्यक्तिशः घेऊन जावी, असे दि.२३.११.२००९ च्या पत्रान्वये कळविले. दि.२८.१२.२००९ रोजी पुन्हा पत्र पाठविले व तरीही त्यानी संपर्क न साधल्यामुळे नस्ती बंद केल्याचे दि.२९.१.२०१० च्या पत्रान्वये कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मंडल कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांचे कार्यालय, कृषी विभाग, कराड, उत्तर तालुका, जि.सातारा श्री.अरूण सोपानराव तावरे यानी केले. यातील कोणतेही पत्र आपल्याला मिळाले नाही, परंतु शुल्क भरून माहिती घेऊ, असे निवेदन श्री.कांबळे यानी केले. त्यानुसार त्यानी माहिती घ्यावी. मात्र विशिष्ट नमुन्यात माहिती संकलित करून देणे बंधनकारक नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि :- ३१ जानेवारी २०११**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.ज्ञानेश्वर बाळासाहेब राऊत
ऑफिस नं.ए-४, ३५१, रास्ता पेठ, के.ई.एम.हॉस्पिटलसमोर, पुणे-११ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, स्वामी विवेकानंद विद्यालय,
आंबेगाव पुनर्वसन, केडगांव, ता.दौंड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०२२ / २०१० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.१.२०११ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.ज्ञानेश्वर बाळासाहेब राऊत
ऑफिस नं.ए-४, ३५१, रास्ता पेठ, के.ई.एम.हॉस्पिटलसमोर, पुणे-११

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे श्रीमती विद्या शिंदे

| | |
|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, स्वामी विवेकानंद विद्यालय, आंबेगाव पुनर्वसन, केडगांव, ता.दौंड, जि.पुणे श्रीमती शारदा पांडुरंग जाधव |
| ४ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

स्वामी विवेकानंद विद्यालय, आंबेगांव पुनर्वसन, ता.दौंड, जि.पुणे या शाळेच्या शाळा समितीच्या कामकाज नोंदवहीच्या प्रती आपण मागितल्या असून इतर माहिती दिली असली तरी कामकाजाची माहिती नष्ट करण्याचा प्रयत्न झाला आहे व माहिती देण्याबाबत दिशाभूल केली जात आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.ज्ञानेश्वर बाळासाहेब राऊत यानी केले.

श्री.राऊत यांच्या दि.२८.४.२०१० च्या अर्जाला दि.२२.५.२०१० रोजीच्या पत्रान्वये रजिस्टर्ड टपालाने उत्तर पाठविले. ते परत आले. समितीच्या कामकाजाच्या सन २००८ पासूनच्या नोंदी ठेवण्यात आल्या असून अपीलकर्त्यास त्याच्या प्रती देता येतील. तसेच उच्च न्यायालयात दावा दाखल असल्यामुळे काही माहिती देता येणार नाही असे कळविले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, स्वामी विवेकानंद विद्यालय, आंबेगाव पुनर्वसन, केडगांव, ता.दौंड, जि.पुणे श्रीमती शारदा पांडुरंग जाधव यानी केले. आतापर्यंत श्री.राऊत याना १७४४ पृष्ठांच्या प्रती देण्यात आल्या असल्याचे त्यानी नमूद केले.

उपलब्ध कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, स्वामी विवेकानंद विद्यालय, आंबेगाव पुनर्वसन, केडगांव, ता.दौंड, जि.पुणे यानी दोन दिवसांत अपीलकर्त्यास निःशुल्क द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु त्यानुसार माहिती मिळाली नाही व प्रकरण कोणत्या न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे याचा पुरावाही जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, स्वामी विवेकानंद विद्यालय, आंबेगाव पुनर्वसन, केडगांव, ता.दौंड, जि.पुणे यानी दिलेला नाही, अशी तक्रार श्री.राऊत यानी तारीख नसलेल्या, दि.१२.१.२०११ रोजी आयोगास प्राप्त झालेल्या

पत्रान्वये केली. त्याबाबत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, स्वामी विवेकानंद विद्यालय, आंबेगाव पुनर्वसन, केडगांव, ता.दौंड, जि.पुणे यानी खुलासा करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

